
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा वा.
दा. क्र. 4334



RRMRBK-0204334

# श्रीमदाद्य शंकरा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

चित्रशाळा प्रकाशन : पुणें २

मुद्रक व प्रकाशक
दामोदर त्र्यंबक जोशी
बी. ए. ( टिळक ),
चित्रशाळा प्रेस, १०२६
सदाशिव पेठ, पुणें नं. २

★

आवृत्ति १ ली

★

मार्च १९५३

ग्रं. क्र. 8338

# लेखकाचे दोन शब्द

आद्य जगद्‌गुरूंचें हें छोटें चरित्र माझ्या बालमित्रांच्या हातीं देण्यास आज मला अत्यानंद होत आहे. प्राचीन इतिहासाच्या अभ्यासू विद्यार्थ्यांशिवाय या आद्य वैदिक धर्म-संस्थापकाची माहिती अगदीं थोड्याच विद्यार्थ्यांना आहे हें जाणून मीं ही पुस्तिका लिहिण्याचा यत्न केला.

आचार्यांच्या चरित्रांतील कठीण तात्त्विक विचारांचा भाग सोडून बालमित्रांना उपयुक्त होणारे जे गुण मला या चरित्रांत दिसले तेच गोष्टी-रूपानें मीं लिहिले आहेत. बालमित्रांना या गोष्टी आवडून त्या उद्‌बोधक ठरतील व त्यांना चरित्र-वाचनाची गोडी लागेल असा मला विश्वास आहे. चारित्र्यसुधारणेसाठीं थोरांचीं चरित्रें उपयुक्त ठरतात.

वाणीची शुद्धता ही बाल्यावस्थेंत होत असते या हेतूनें आचार्यरचित कांहीं मधुर स्तोत्रें व अष्टकें मुद्दाम शेवटीं दिलीं आहेत. शुद्धवाणीसाठीं यांचें पाठांतर उपकारक ठरेल.

हें पुस्तक लिहितांना मीं शांकरदिग्विजयांचा व केरळ-कोकिळ कै. आठल्ये यांच्या पुस्तकाचा भरपूर उपयोग करून घेतला त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. त्याचप्रमाणें चित्रशाळा प्रकाशन पुणें या संस्थेनें माझ्या छोट्या ग्रंथाचें प्रकाशन केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

माझ्या बालमित्रांनीं वाचनासाठीं याचा भरपूर उपयोग केल्यास माझ्या लिखाणाचें कार्य सफल झालें असें मी मानतों.

दि. २६-२-५३
जतकर बिल्डिंग, शहापूर पेठ,
विजापूर

लेखक
वासुदेव गणेश मुळगुंद

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | ईश्वरी संकेत | १ |
| २ | वैदिक धर्माची ग्लानि | २ |
| ३ | देवांचा संकल्प | ६ |
| ४ | सुधन्वा व कुमारीलभट्टांचे अवतार | ७ |
| ५ | मंडनमिश्र व सरस्वती | ९ |
| ६ | आचार्यांची जन्मभूमि | १० |
| ७ | आचार्यांचा जन्म | ११ |
| ८ | आचार्यांचें बालपण | १२ |
| ९ | गुरुगृहवास | १३ |
| १० | आचार्यांना केरळ राजाचें निमंत्रण | १५ |
| ११ | आचार्यांच्या भेटीसाठीं कांहीं ऋषींचें आगमन | १६ |
| १२ | आचार्यांची संन्यास-दीक्षा | १७ |
| १३ | आचार्यांचें शिष्यचतुष्टय | २० |
| १४ | मंडनमिश्र-सुरेशाचार्य | २१ |
| १५ | हस्तामलक | २३ |
| १६ | आनंदगिरी-त्रोटकाचार्य | २५ |
| १७ | शिव व आचार्य-संवाद | २६ |
| १८ | कापालिकाचा वध | २८ |
| १९ | मृत ब्राह्मणपुत्रास उठविलें | २९ |
| २० | मातुश्रींचा अंत्यविधि | ३० |
| २१ | क्रकचाचा वध | ३१ |
| २२ | आचार्यांचे ग्रंथ | ३३ |
| २३ | अनेक उपासकांचें खंडन | ३४ |
| २४ | धर्मप्रसार व मठांची स्थापना | ३६ |
| २५ | शारदापीठावर आरोहण | ३७ |
| २६ | आचार्यांचें कैलास गमन | ३८ |
| २७ | आचार्यांची काव्यशैली | ३९ |

तीर्थरूप वडिलांच्या चरणीं
समर्पण –

2062
3-7-67

# श्रीमदाद्य शंकराचार्य

# प्रस्ताव

जीवाच्या चेतनाशक्तीचा विचार केला तर तो एक ईश्वरी अंशच असल्याबद्दल आपली खात्री होते. जो जीव आपल्यासारख्या असंख्य जीवांचें संकटापासून रक्षण करितो, त्यांचा उद्धार करतो, त्यांना अखंड सन्मार्ग लावून देतो, ज्याचा प्रभाव पाहून सर्व लोक चरणीं लीन होतात, त्या पुरुषाला लोक ईश्वरावतार समजतात. अशा प्रकारचे ईश्वरी अवतार अनेक देशांत अनेक होऊन गेले. त्यांत आमच्या भरतखंडांत तर पुष्कळच. राज्यसंस्थापक व धर्मसंस्थापक हे त्यांतील प्रमुख होत.

धर्मसंस्थापकाचे गुण राजाच्या गुणाशीं अगदीं भिन्न असतात. राजाचें अन्तिम स्वार्थ असतो तर धर्मगुरूचें अन्तिम परमार्थ असतो. राजाचा मार्ग प्रवृत्तीचा तर धर्मगुरूचा मार्ग निवृत्तीचा. धर्मगुरु शब्दानें सुद्धां कोणाला दुखवीत नाहीं. सत्य, दया आणि क्षमा हें त्याचें ब्रीद असतें. तो आपला पगडा मधुरवाणीनें, सत्याचरणानें, सप्रमाण सिद्धान्तानें बसवितो. लोक धर्मसंस्थापकाच्या पायाशीं पूज्य भावनेनें नम्र होतात.

आपल्या भरतखंडांत असे जे कोणी धर्मसंस्थापक होऊन गेले, त्या सर्वांच्या शिरोभागीं अद्वैतमताचा सिद्धान्त स्थापन करणारे ‘ श्रीमज्जगद्गुरु आद्य शंकराचार्य ’ यांची गणना होते.

० ० ०

25502
आ.वा
2062
3-2-91

## ईश्वरी संकेत

या मृत्युलोकावर वैदिक धर्म अगदीं अनादिकालापासून चालत आला आहे. वेद हे अनंतकालाचे असून ते अपौरुषेय आहेत, असा आर्यांचा समज आहे. वेदांचा अतिशुद्धपाठ अनंतकाळापासून ऋषि व ब्राह्मण परस्परांस पढवून मुखानेंच चालवीत आले आहेत म्हणूनच त्यास ' श्रुति ' असें म्हणतात. पृथ्वीवर वेद हाच पुरातन व श्रेष्ठ ग्रंथ होय. आर्य लोकांनीं त्याचेंच आजपर्यंत जीवापलीकडे संरक्षण केलें आहे. ते बुडण्याचा प्रसंग आला असतां देवाची ते अनन्यभावानें प्रार्थना करतात. अशा समयास देवहि आपण होऊन जगतींतलावर अवतीर्ण होऊन त्यांचें संरक्षण करतात.

' श्रुतिस्मृतिप्रतिपादित धर्माची प्रतिष्ठापना करण्याकरितां, भक्तांचें हित साधण्याकरितां कैलासनाथ शंकर कलियुगांत स्वतः अवतार धारण करील व ज्यांत ब्रह्मस्वरूपाचा विचार सांगितला आहे, ते वेदान्तांतील सारभूत ज्ञान शिष्यांस पढवील ' असें भविष्यहि पूर्वीं ज्ञात्यांनीं व पौराणिकांनीं करून ठेविलेलेंच होतें. पण हें भविष्यहि खरें होण्याला पृथ्वीवर अशीच स्थिति प्राप्त व्हावी लागते. ती कशी काय झाली होती व पुढें हें भविष्य कसें प्रत्ययास आलें याचा आतां थोडक्यांत विचार करूं.

# वैदिक धर्माची ग्लानि

वेद हे अनादि कालापासून परमेश्वरानेंच निर्माण केले. ऋषि व मुनि यांजकडून त्यांचें संरक्षण करवून त्यानें धर्म-स्थापना केली. प्रथम धर्माचा उत्तम प्रसार होतो. कालांतरानें पाखंडी व बुद्धिभेद करणारे पंडित निर्माण होतात. स्थापित धर्म डळमळूं लागून लोकांची श्रद्धा साहजिकच कमी कमी होत जाते. शेवटीं धर्म-लोप पावून जिकडे तिकडे अधर्म माजून राहतो. अशा अत्यंत निराशाजनक परिस्थितींत परमेश्वर स्वतः अवतार घेतो व पुनः धर्माची महती सिद्ध करून सर्वांस सन्मार्गास लावतो. अशा तऱ्हेचा सृष्टिक्रम नित्याचाच आहे. आचार्यांचा अवतार होण्यापूर्वीं सुद्धां अशीच अंधारमय परिस्थिति भारतांत होती.

वैदिक धर्माची श्रद्धा उडत चालली होती. ईश्वर म्हणून कोणी सृष्टीचा नियंताच नाहीं अशी मनाची समजूत झाली होती. ईश्वराच्या अस्तित्वाचा मनुष्याच्या मनाला मुळींच धाक राहिला नव्हता. पातकाची प्रवृत्ति माजली. कलियुगाचा प्रारंभ झालेलाच होता. चार्वाकादि नास्तिकांची संख्या वाढूं लागली व त्यांचा वैदिक धर्मावर हल्ला होऊं लागला.

नास्तिकांत अग्रगण्य अशा चार्वाकाचा जन्म अवंति देशांत शंखोद्धार क्षेत्रामध्यें झाला. ह्याच्या पित्याचें नांव इन्दुकान्त व आईचें नांव सृग्विणी असें होतें. हा मोठा विद्वान् असून दृष्टान्तानें आपलीं मतें तो खुलवून सांगत असे. हा वादविवाद करण्यांत मोठा चतुर होता. ह्याच्या नास्तिक मताच्या प्राबल्यामुळें सनातन धर्माची विलक्षण अवनति होऊं लागली. याच्या मतांत नीतीचा व सौजन्याचा लेशहि नव्हता.

चार्वाकाचीं मतें—

(१) ईश्वर म्हणून मुळींच नाहीं; परलोक नाहीं; व परलोकाच्या यातनाहि नाहींत.

( २ ) धर्म हें केवळ स्वार्थी व पोटभरू भटांनीं माजविलेलें थोतांड होय.

( ३ ) आत्मा अमर नाहीं. पान, सुपारी, कात, चुना एकत्र केल्यानें जसा तांबडा रंग उत्पन्न होतो, त्याप्रमाणें कांहीं तत्त्वांच्या संयोगानें देह उत्पन्न होऊन दारूच्या कैफाप्रमाणें आत्मा किंवा जीव उत्पन्न होतो. म्हणून देहाबरोबर आत्म्याचाहि लय होतो.

( ४ ) श्राद्धांत पिंडदान केल्यानें जर तें पितरांस पोंचतें, तर तळ-मजल्यांत केलेला स्वयंपाक तो वरच्या मजल्यावर कां न जावा?

( ५ ) अमुक एकाची स्त्री असें निश्चित करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. पाहिजे त्यानें पाहिजे त्या स्त्रीचा उपभोग घ्यावा.

( ६ ) यमयातनाच जर नाहींत तर भ्यावें कशाला? खुशाल ऋण काढून सण करावा. कारण, देह गेला कीं सर्व आटोपलें.

वरील सर्व मतांचा फैलाव फारच मोठ्या प्रमाणांत झाला. त्याचे अनुयायी उत्पन्न होऊं लागले. नास्तिक मत बळावत जाऊन लोकांची खऱ्या धर्मावरील श्रद्धा उडूं लागली. यानंतरचे नास्तिक सौम्य होते.

**गौतमबुद्ध—**

नेपाळच्या दक्षिण सरहद्दीवरील प्रदेशांत शाक्य नांवाचे लोक राहात होते. या प्रदेशाच्या पश्चिमेस कोसल देश आहे. उत्तर-कोसलांत कापिलवस्तु नांवाची नगरी आहे. ही पूर्वीं शाक्यांची राजधानी होती. तेथें शुद्धोदन नांवाचा त्यांचा नायक राज्य करीत होता. शुद्धोदनाच्या पत्नीचें नांव मायादेवी. या दांपत्यास इ. स. पूर्वीं ६२३ सालीं पुत्र झाला. त्यांनीं त्याचें नांव सिद्धार्थ असें ठेविलें. शुद्धोदनानें त्यास उत्तम प्रकारचें शिक्षण दिलें. तो धनुर्विद्येंत प्रवीण झाला. त्याचें लग्न यशोधरा नांवाच्या राजकन्येशीं झालें. पुढें त्यास राहुल नांवाचा पुत्र झाला. राजैश्वर्य अनुभवणाऱ्या सिद्धार्थाचें मन ऐहिक सुखांत फारसें रमलें नाहीं. तो सगळीकडे

बारकाईनें पाँहून विचार करीत असे. "यज्ञानें मोक्ष मिळतो का? यज्ञांतील हत्या देवास आवडते का? समाजनियमनांतील अन्याय देवास मान्य आहे का?" वगैरे गोष्टींचा तो रात्रंदिवस विचार करी व समाधान न झाल्यानें त्याच्या मनाचीं तळमळ वाढे. यांतच भर म्हणजे एके दिवशीं त्यानें एका तरुणाचें प्रेत, महारोग्याची दुर्दशा व त्या नगरींतील भिक्षुकांची हलाखीची स्थिति हें पाहून आयुष्य हें नश्वर आहे असें ठरवून त्यानें संसारसुखावर लाथ मारली व अरण्याचा रस्ता धरला. अगर दीर्घ विचारांच्या परिणामानें अंतःकरणांत जें वैराग्य बाणलें त्याचाहि हा परिणाम असेल. अरण्यांतील एकान्तवासांत त्यानें आपला सहा वर्षांचा काल अध्ययनांत व तपश्चर्येत घालविला. तरी त्याच्या मनाची तळमळ शांत होईना. शेवटीं तो गयेस आला. तेथें एका झाडाखालीं शांतपणें चिंतन करीत बसलेला असतां एकाएकीं त्यास दिव्य ज्ञान प्राप्त झालें. त्याच्या मनाची तळमळ शांत झाली.

बौद्ध धर्माचीं तत्त्वें—

( १ ) परमेश्वर नाहीं.

( २ ) आपला आत्मा हाच परमेश्वररूप आहे. त्यासच सदाचरणानें व परोपकारानें पूर्णत्व येतें.

( ३ ) मानवानें स्वच्छंद वर्तन करूं नये.

( ४ ) सत्कर्म करावें व परोपकारार्थ देह झिजवावा.

( ५ ) 'अहिंसा परमो धर्मः' हेंच त्याचें मुख्य तत्त्व.

( ६ ) वेद हे थोतांड आहेत.

( ७ ) यज्ञयागादि कृत्यानें मोक्षप्राप्ति होणार नाहीं.

बौद्धधर्माचा प्रसार होण्याचीं कारणें—

( १ ) त्यानें स्त्रियांना आपल्या संघांत भिक्षुणी म्हणून प्रवेश दिला. वाटल्यास त्या स्त्रियांनीं जन्मभर संन्यस्त वृत्तीनें व स्वतंत्रतेनें राहावें.

(२) आपल्या पंथांत प्रवेश करणाऱ्या लोकांतील उच्चनीच भाव काढून समतेची स्थापना केली.

(३) आपल्या धर्माची शिकवण सुगम पाली भाषेंतून केली.

(४) स्वतः संन्यस्तवृत्ति स्वीकारून इतरांसाहि ही दीक्षा दिली.

महावीर वर्धमान—

हाहि गौतमाचा समकालीन होय. याचा जन्म गंगेच्या उत्तरेस वैशाली येथील लिच्छवी सरदाराच्या कुळांत झाला. याला जैन धर्माचा संस्थापक असें मानतात. गौतमाप्रमाणेंच त्यानें ऐहिक सुखाचा त्याग करून बारा वर्षे घोर तपश्चर्या केली. लोक त्यास महावीर किंवा जिन (इंद्रियें जिंकणारा) असें म्हणूं लागले. त्याच्यावरून त्याच्या अनुयायांस जैन असें नांव मिळालें. जैन व बौद्ध धर्मांत मोठें साम्य आहे. जैन धर्मांत संन्यास व अहिंसा वृत्तीचा अतिरेक झालेला आहे. जीव दुःखमय असल्यानें शरीर झिजवून दुःखमय जीविताचा शेवट करणें जैन धर्मास मान्य आहे.

शाक्तपंथी व देवी-उपासक—

मद्यमांसावांचून त्यांचा नैवेद्यच होत नसे. हें मत समाजांत दुर्व्यसन माजविणारें होतें.

गणपति व भैरव-उपासक— असे अनेक पंथ उत्पन्न होऊन देवतांचा साराच घोटाळा माजून राहिला होता. वैदिक धर्म शिथिल होऊन वेदोपनिषदांचीं तत्त्वें कोणास कळेनाशीं झालीं. अशा रीतीनें वैदिक धर्माचा ऱ्हास झाल्यामुळें कोणीतरी अवतारी पुरुष उत्पन्न होऊन पुनः वैदिक धर्माची स्थापना करण्याची संधि अनायासेंच चालून आली व त्याप्रमाणें पुढें अवतार झाले.

## देवांचा संकल्प

त्रिभुवन-संचारी ब्रह्मर्षि नारद मृत्युलोकावर आले. मृत्युलोकावर कांहीं कमीजास्ती आढळल्यास ते देवलोकांत जाऊन त्याबद्दल चर्चा देत असत. त्रिभुवन सन्मार्गानें चालावें, मृत्युलोकांतील सर्व लोक सुखानें राहावेत अशी यांची इच्छा. यांना मृत्युलोकाची फार काळजी. मृत्युलोकांतील वैदिक धर्माची शोचनीय स्थिति त्यांच्या दृष्टीस पडली. हा वृत्तान्त त्यांनीं पिता ब्रह्मदेवास कळविला. इन्द्रादि सर्व देवांना बोलावून चतुराननानें देवांना सर्व हकीकत सांगितली; भगवान् शंकरास ही गोष्ट कळवावी म्हणून ब्रह्मदेव सर्व देवांसह कैलासास आले. देवांनीं शंकरांची स्तुति केली. शंकर प्रसन्न झाले. देवांना येण्याचें कारण विचारलें. ब्रह्मदेवानें सर्व गोष्ट सांगितली. "मृत्युलोकावर चार्वाकादि नास्तिकांचें बंड मोडण्याकरितां श्रीविष्णूंनीं बुद्धाचा अवतार धारण केला व त्या मताचें खंडन केलें, पण तेंच मत लोकांत प्रचलित होऊन अज्ञानी लोक गैरसमजुतीनें वेदांचा अपमान करूं लागले आहेत. कर्मकांडाचा लोप होऊन गेला. वेदांना कोणी विचारीनासे झाले. परमेश्वर मुळींच नाहीं असें लोक समजतात. अज्ञान माजून यज्ञयागादिक सर्व क्रिया बंद पडल्या आहेत. यामुळें पृथ्वीवर प्रजेची दुर्दशा होईल. पृथ्वीवर मानवांचा तरणोपाय होईल अशी व्यवस्था होणें योग्य." ही प्रार्थना ऐकून क्षणभर शिवानें विचार केला. आपला पुत्र षडानन यास बोलावून त्यास अशी आज्ञा केली कीं, "मृत्युलोकीं सर्वांच्या आधीं कुमारीलभट्ट या नांवानें अवतार घेऊन वैदिक धर्माची स्थापना करावी. सुधन्वा राजा होऊन कुमारीलभट्टास साहाय्य करावें. विधर्मी लोकांचा मोड करावा," अशी इन्द्रास आज्ञा केली. "मंडनमिश्र नांवानें अवतार धारण करून कर्मकांडाची स्थापना करावी" अशी ब्रह्मदेवास आज्ञा केली. सरस्वतीनें मंडनमिश्राचें पत्नीपद स्वीकारावें. व आपण स्वतः शंकराचार्यांचा अवतार घेऊन ज्ञानकाण्डाचा प्रसार करावा असें ठरविलें. देवांनींहि शंकरास साहाय्य करण्याचा निश्चय केला विष्णूनें

पद्मपाद व्हावें. वायूनें हस्तामलक व्हावें. बृहस्पतीनें आनंदगिरींचा अवतार घ्यावा. सूर्यानें सनंदनाचा अवतार घ्यावा. वरुणानें चित्सुक व्हावें. याप्रमाणें सर्व देवांनीं अवतारकृत्यें वांटून घेऊन जगदुद्धाराचा संकल्प केला.

## सुधन्वा व कुमारीलभट्टांचे अवतार

चार्वाकादि नास्तिकांचें प्राबल्य होऊन त्यांच्या मतांचा प्रसार झाल्यावर श्रीविष्णूंनीं गौतमबुद्धाचा अवतार धारण केला. या अवतारामुळें अधार्मिक नास्तिकांचें बंड कमी झालें; सत्कर्माकडे व परोपकाराकडे लोकांची प्रवृत्ति झाली. 'परमेश्वर नाहीं, वेद हें प्रामाण्य नव्हे,' या बुद्धमतानें वैदिक धर्माची श्रद्धा उडत जाऊन कर्म व ज्ञान यांचा लोप होऊन तीं बहुतेक नामशेष होऊं लागलीं.

बुद्धाच्या पाठोपाठ जैन धर्माचा फैलाव झाला. 'अहिंसा परमो धर्मः' हें जैनांचें आद्य मत. या धर्मीयांनीं वैदिक धर्माचा छळ केला. वेद-वाक्यांची व उपनिषद्भागाची विटंबना केली. वेदज्ञानाचा अभाव होऊन भलभलतींच मतें व क्षुद्र दैवतें अधिकाधिक प्रचारांत येऊं लागलीं. अशोक सम्राटाच्या मदतीनें जिकडे तिकडे उभय धर्मांचा जास्तच फैलाव झाला.

अशोकानंतर 'मेदिनीपूर' (मिदनापूर) येथें इंद्राच्या अंशेंकरून सुधन्वा राजा झाला. तो प्रथमतः जैन धर्माचा चाहता होता. याच्या दरबारीं अनेक जैन विद्वान् व साधु होते. याच्याच कारकीर्दींत तैलंगण देशांत जयमंगल गांवीं षडाननांशेंकरून 'कुमारीलभट्ट' (भट्टपाद) या विद्वान् ब्राह्मणाचा जन्म झाला. याच्या पित्याचें नांव यज्ञेश्वरभट्ट व आईचें नांव चंद्रगुणा असें होतें. हा अत्यंत बुद्धिमान् असल्यानें थोड्याच काळांत चांगली विद्या संपादन केली. श्रीनिकेतन नामक जैन आचार्या-जवळ हा अध्ययनास राहिला. हा वेदाचा कट्टा अभिमानी व जैनधर्माचा

निहन्ता होता. जैनधर्मीयांवर हल्ला चढवून त्यांना आत्मवश करावें अगर त्यांचा नाश करावा या विशिष्ट उद्देशानें त्यानें जैन धर्माचें यथायोग्य पठण केलें व त्या धर्माचीं तत्त्वें गुरूकडून समजावून घेतलीं. अध्ययनानंतर दिग्विजय संपादन करण्यास निघाला. शेंकडों जैन शास्त्र्यांस व बुद्धादिकांस जिंकून विजयपत्रें घेत घेत मेदिनीपुरास आला. तेथें सुधन्वा राजा होता. हा विद्वानांचा चाहता व गुणग्राही होता. कुमारीलभट्टानें आपण आल्याची वर्दी दिली. याची कीर्ति पूर्वींच राजानें ऐकली होती. राजा सन्मानानें सामोरा गेला. अर्घ्यपाद्यादि पूजन केल्यावर त्याला कुशल प्रश्न केले.

कुमारीलभट्टानें यथाप्रकार उत्तरें दिलीं.

इतक्यांत पलीकडे एक वृक्ष होता. त्याच्यावर बसलेला कोकीळ पक्षी मधुरस्वरानें गायन करूं लागला. त्यास अनुलक्षून भट्टपादानें राजास अन्योक्तिरूप बोध केला.

'हे कोकिळा! मलीन व श्रुतिदूषक अशा कावळ्यांच्या कुळाची तुला जर संगति नसती, तर तुझें वर्णन करण्यास कोण समर्थ होते?' हें खोचदार भाषण ऐकून सभेंतील मोठमोठे बुद्ध व जैन विद्वान् खवळले व भट्टपादाशीं वाद करूं लागले. भट्टपादानें आपल्या वेदविद्येच्या जोरानें सर्वांचा पराभव केला. राजाला वैदिक धर्माचीं मतें पटविलीं. 'वेद हेच प्रमाण आहेत हें मला व या जैन विद्वानांना पटण्यासाठीं एकदां साक्षात्कार दाखवावा,' असें राजानें विद्वान् सभेंत म्हटलें. "पर्वताच्या कड्यावरून उडी घेऊन अपाय न होतां परत याल तर आम्ही आपले वेद व वैदिक धर्म प्रमाण असे मानूं." त्यांनीं सर्वांसमक्ष हरिः ॐ असें म्हणून पर्वताच्या उंच कड्यावरून उडी टाकली व कापसाचा गोळा खालीं पडावा याप्रमाणें सहज कड्याच्या तळाशीं अपाय न होतां खालीं आले. यांनीं दुसरा एक चमत्कार दाखविला. राजानें एका घागरींत सर्प घालून विद्वानांच्या सभेंत सर्व जैन शास्त्र्यांच्या व कुमारीलभट्टाच्या परीक्षेसाठीं

ठेवला. त्यांनीं त्याचें रूपान्तर शेषशायी मूर्तींत केलें व राजास वैदिक धर्माची महती पटविली. या दोनहि साक्षात्कारांनीं राजानें वैदिक धर्माची दीक्षा घेतली व जैनांचा नाश केला.

कुमारीलभट्टांना भेटण्यासाठीं मुद्दाम आचार्य शिष्यासह प्रयागक्षेत्रीं आले. तेथें आचार्यांनीं त्यांचें दर्शन घेतलें. गुरूचा द्रोह घडला, सहस्रावधि बुद्ध व जैनांची हत्या झाली. इत्यादि महत्पातकाबद्दल मनास अत्यंत उद्वेग होऊन त्या पातकांतून मुक्त होण्यासाठीं तुसाचा ढीग रचून त्याला अग्नि लावून त्यांवर बसलेले दिसले. तेथें बसूनच कुमारीलभट्टांनीं आचार्यांस उपदेश केला. ज्याची कीर्ति दिगंत पसरली आहे असा माझा अजिंक्य शिष्य व मेहुणा मंडनमिश्र पंडित माहेश्वरी नगरींत आहे. त्याची स्त्री सरस्वती त्याहून बुद्धिमती आहे. या उभयतांचा वादांत पराभव करून मंडनपंडितास संन्यास-दीक्षा द्या. तोच पुढें आपल्या भाष्यावर वार्तिक करील. इतकें भाषण झाल्यावर कुमारीलभट्टांनीं तारकमंत्राचा उपदेश करण्याची विनंती केली. त्याप्रमाणें आचार्यांनीं उपदेश केल्यानंतर भट्टपाद त्या तुसाग्नीमध्यें भस्म होऊन वैकुंठास गेले.

## मंडनमिश्र व सरस्वती

चोळीमहेश्वर (माहिष्मती) येथें पंचगौडापैकीं कान्यकुब्ज जातीच्या ब्राह्मणाचें एक घराणें राहात होतें. या घराण्यांत एक फारच बुद्धिमान् पुत्र निपजला. याचें नांव विश्वरूप. हाच मंडनमिश्र. याच्या लहानपणांतच याची कीर्ति दिगंत पसरली.

शोण नदीच्या तीरावर विष्णुमित्र नांवाचा दुसरा विद्वान् ब्राह्मण राहात होता. याला एक कन्या होती. तिचें नांव सरस्वती. ही फार बुद्धिमती असल्यानें तिचें सरस्वती हें नांव सार्थ झालें.

सरस्वतीच्या बुद्धिमत्तेची कीर्ति विश्वरूपाच्या कानांवर व विश्वरूपाच्या बुद्धिमत्तेची कीर्ति सरस्वतीच्या कानांवर गेली. यामुळें उभयतांहि

परस्परांच्या भेटीसाठीं अत्यंत आतुर होतीं. त्याप्रमाणें योग आल्यावर परस्परांचें प्रेम जडलें. विष्णुमित्राला ही गोष्ट समजली. उभयतांच्या समानगुणामुळें मोठ्या थाटानें विष्णुमित्रानें सरस्वती विश्वरूपास अर्पण केली. सासरीं जात असतां तिच्या आईनें सरस्वतीस चांगला उपदेश केला. "बालपणाचा हूड स्वभाव टाक. आपल्या कुळाचा मोठेपणा व थोरवी यांचें रक्षण कर. विनयानें व मर्यादेनें वाग. पति हेंच आपलें दैवत आहे." सरस्वतीनें मातेचा हा उपदेश मान्य केला. मोठ्या प्रेमानें व सद्गदित अंतःकरणानें मातापितरांस वंदन करून आपल्या पतीबरोबर सासरीं गेली. बुद्धिमान्, तेजस्वी व कर्मकांडाचे उपासक मंडनामिश्र व अमित तेजानें भरलेली, बुद्धिमती व सती सरस्वती या समानगुणी जोडप्यांच्या प्रेमपूर्वक संसारांतील आनंद काय वर्णावा!

## आचार्यांची जन्मभूमि

आचार्यांची जन्मभूमि 'केरळ देश' होय. यालाच हल्लीं मलबार असें म्हणतात. हा भाग सुपीक, व्यापारांच्या सोयीचा, सृष्टिसौंदर्यानें भरलेला, विपुल पर्जन्याचा, नद्या, सरोवरें, निर्झरें यांच्या विपुलतेनें पाणी ठिकठिकाणीं खेळत आहे; यामुळें या भागास दुष्काळ माहीत नाहीं. पूर्व बाजूस सह्याद्रि असून त्यांत घोर जंगल असल्यानें साग, वेलदोडे, मध, तवकीर, मिरी, कॉफी वगैरे पदार्थ विपुल उत्पन्न होतात. पश्चिमेस अफाट वस्तीचीं मैदानें असून त्यांत नारळ व पोफळींचीं झाडें इतकीं घनदाट भरलीं आहेत कीं त्यांतून सूर्याचे किरण सुद्धां भूभागावर येत नाहींत. ठिकठिकाणीं गोड्या पाण्याचीं शोभिवंत विशाल सरोवरें, सुंदर वृक्षांच्या रांगा, इकडे तिकडे डौलानें संचार करणारे हत्तींचे कळप, चित्रविचित्र रंगांचे रमणीय पक्षी, मोठमोठीं देवालयें व गोपुरें, समुद्रतीराची व नदीकिनाऱ्याची शोभा यांमुळें केरळ देश प्रतिस्वर्गच आहे असा वाटतो.

२०८२ ३-५-६१ ११

जसा हा प्रान्त निसर्गरमणीय तसेचे तेथील लोकाहि सत्त्वस्थ वृत्तीचे आहेत. हे ब्राह्मण संस्कृतज्ञ व विद्वान् आहेत. हे दिसण्यांत साळसूद व नेभळट असतात. हे नेहमीं सत्य बोलतात असा समज आहे. यांची भाषा मलबारी व कानडी. या देशांत राहणाऱ्या ब्राह्मणास नंबुद्री ब्राह्मण असें म्हणतात. या लोकांची देव-ब्राह्मणांवर विशेष श्रद्धा असते. यांच्या-मध्यें दातृत्व मोठ्या प्रमाणांत असते. यांच्यांतील स्त्रिया सत्त्वशील, पतिव्रता व शुचिर्भूत असतात. अवतार घेण्यास परमेश्वरास योग्य प्रदेश व पवित्र वंश लागतो. आपल्या अवतारासाठीं शिवानें हाच पवित्र व संपन्न प्रदेश निवडला.

## आचार्यांचा जन्म

याच पवित्र केरळ देशांत पूर्णा नदीच्या उत्तर-तीरीं कालडी म्हणून एक लहान गांव आहे. हा गांव एका ब्राह्मणास अग्रहार (इनाम) म्हणून दिलेला आहे. या गांवांत केरळ देशाच्या राजानें ज्योतिर्लिंगाची स्थापना करून एक मोठें देवालय बांधलें. येथें या देवाची परमभक्तीनें पूजा करून षट्कर्मे आचरून सर्व ब्राह्मण सदाचरणानें राहात असत. त्यांत एक विद्याधिराज नांवाचा पंडित-श्रेष्ठ व शंकराचा परमभक्त राहात होता. या पंडितवरास शिवगुरु नांवाचा पुत्र झाला. तो ज्ञानी असून बृहस्पतीप्रमाणें बुद्धिमान् होता. योग्य वेळीं याचा उपनयन-संस्कार करून विद्याधिराजानें त्यास विद्याभ्यासासाठीं गुरुगृहीं ठेवलें. गुरुगृहीं बारा वर्षे यानें अध्ययन केलें. वैराग्याविषयीं दृढतर इच्छा असतांना सुद्धां वडिलांच्या आज्ञेवरून त्यानें गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला.

त्याच प्रान्तांत मघपंडित नांवाचा सुशील ब्राह्मण राहात होता. त्याला एक कन्यारत्न होतें. तिचें नांव श्रीअंबिका. आपल्या पुत्रासाठीं विद्याधिराजानें या कन्येसंबंधीं मघपंडिताची याचना केली. ही मुलगी साध्वी, पतिसेवापरायणा, सुशील अशी होती. वैराग्याकडे शिवगुरूची

चित्तवृत्ति असतांना सुद्धां तिच्या स्वभावामुळें शिवगुरु तिच्यावर फारच प्रेम करीत. कांहीं काळानंतर मातापितरांच्या वियोगानें शिवगुरूवर प्रपंचाचा भार पडला. अग्रहाराच्या प्राप्तीनें खाण्यापिण्याची विवंचना नव्हती. विद्वानांची सेवा, अतिथींचा सत्कार, विविध शास्त्रांचा अभ्यास, प्रभुभक्ति या सर्व गोष्टींनीं तें दाम्पत्य सदाचरणानें काल घालवीत असे. संततीच्या अभावाच्या औदासीन्यानें त्या पतिपत्नीनें शिवाराधनेचा निश्चय केला. कांहीं दिवस एकभुक्त व्हावें, कांहीं दिवस उपोषण करावें, कांहीं दिवस केवळ जलपानावर राहावें, कित्येक दिवस निरशनावर काढावेत. याप्रमाणें वृषक्षेत्राच्या ठिकाणीं त्यांनीं घोर तपश्चर्या केली. श्रीशंकर ब्राह्मणरूपानें प्रगट झाले व म्हणाले, "तुम्हांला मंदबुद्धीचे दीर्घायु अनेक पुत्र पाहिजेत का सर्वज्ञ अल्पायु असा एक पुत्र पाहिजे ?" त्या दाम्पत्यांनीं सर्वज्ञ अल्पायु पुत्राची इच्छा दर्शविली. शिवानें तथास्तु म्हटलें व ते अदृश्य झाले. योग्य काळीं श्रीअंबिका गर्भवती झाली. शुभ नक्षत्रावर त्या दाम्पत्यांना पुत्रप्राप्ति झाली.

'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात' या म्हणीनुसार शंकराच्या या अवताराच्या वेळीं कांहीं चमत्कार झाले. दिशा प्रसन्न झाल्या. प्रत्येकाच्या अंतःकरणास विलक्षण आनंद झाला. सुगंधयुक्त वारा वाहूं लागला. सर्व प्राणिमात्र आपापला नैसर्गिक वैरभाव सोडून आनंदानें एकत्र खेळूं लागले. वृक्षांनीं फळांची व पुष्पांची वृष्टि केली. द्वैतवाद्यांच्या हातांतून एकदम सर्व पुस्तकें गळून पडलीं व त्यांना स्वत्वाचें भय वाटूं लागलें. आपला त्राता आला म्हणून वेदान्तशास्त्राला आनंद झाला. देवादिकांनीं पुष्पवृष्टि केली. गंधर्व गाऊं लागले. होमशाळेंतील अग्नि प्रदीप्त झाले. ज्या खोलींत हा मुलगा झाला ती खोली क्षणभर प्रकाशमान होऊन तेथें असलेल्या सर्वांचे डोळे दिपले. पुत्रजन्म होतांच शिवगुरूंनीं स्नान करून ब्राह्मणांस भूमि, गाई, सुवर्ण आदि दानें मोठ्या आनंदानें दिलीं. पुत्रावण वगैरे संस्कार केले. त्यांनीं विधियुक्त पुत्राचें मुख पाहिलें. जातकर्मादि सर्व संस्कार झाले. श्रीशंकराच्या वरदानानें हा पुत्र झाला म्हणून शिवगुरूनें त्याचें नांव 'शंकर' असें ठेवलें.

## आचार्यांचें बालपण

आचार्य बाल्यदशेंत अत्यंत तेजस्वी व पाणीदार दिसत होते. त्यांचे नाक, डोळे तरतरीत असून अंगकांति बालसूर्याप्रमाणें होती. अलोट बुद्धिमत्तेचीं लक्षणें त्यांच्या मुखावर दिसूं लागलीं. ते क्रमाक्रमानें रांगूं लागले. त्यांना पहिल्याच वर्षी अक्षरज्ञान व देशभाषा येऊं लागली. दुसऱ्या वर्षी ते पुस्तक वाचूं लागले. तिसऱ्या वर्षी त्यांना काव्यें, कोश, पुराणें इत्यादि अवगत झालीं. त्यांचा अर्थ करण्याची शक्ति त्यांस आली. आचार्य एकपाठी होते, यामुळें गुरूंची त्यांच्यावर फारच ममता होती. तिसऱ्या वर्षी त्यांचा चूडाकर्म (जायवळ) संस्कार झाला. नंतर लगेच वेदांचा अभ्यास झाला. तर्कशास्त्रादिकांत प्रावीण्य मिळवून पाखांडी मतांचें यथास्थित खंडन करून वेदांचें प्रामाण्य सिद्ध करूं लागले. पांचव्या वर्षीच त्यांचा उपनयन-संस्कार करून गुरुगृहीं अध्ययनास ठेवावें अशी शिवगुरूंची तीव्र इच्छा. पण मानवाच्या लीला एक तर दैवाच्या लीला अगदींच भिन्न असतात. दुर्दैवानें आचार्यांच्या चौथ्या वर्षीच शिवगुरूंचा काल झाला. बालपणांतच आचार्यांना पितृवियोगाचें दुःख सहन करावें लागलें. मातेवर तर दुःखाचा डोंगरच कोसळला. पित्यानें ठरविल्याप्रमाणें सर्व दुःखें बाजूस सारून मातेनें सर्व बांधवांच्या मदतीनें पांचव्या वर्षीच आचार्यांचा उपनयन-संस्कार केला. गुरुमुखाशिवाय खऱ्या विद्येची प्राप्ति नाहीं म्हणून सर्व विद्यापारंगत गुरूकडून मातेनें त्यांचें अध्ययन करविलें. आचार्य विद्याभ्यासासाठीं गुरुगृहीं राहिले.

## गुरुगृहवास

गुरूपाशीं शिक्षा, ज्योतिष, छंद, निघंटु वगैरे सहा अंगें व चार वेद मिळून दशग्रंथांचा अभ्यास अल्पावधींत केला. गुरूंनीं एक पाठ दिला कीं तो त्यांचा तत्काळ वज्रलेप होत असे. रोज नवा पाठ देतांना गुरूंची मोठी त्रेधा उडे. आज कोणता नवा पाठ द्यावा, उद्यांच्या कोणत्या

नव्या पाठाची योजना करावी या विचारानें गुरु गोंधळून जात. असा चतुर शिष्य लाभल्यानें आचार्यांना शिकवीत असतां गुरूंना मोठा आनंद होत असे. दोन-तीन महिन्यांतच आचार्यांनीं षट् शास्त्रांचा अभ्यास पूर्ण केला. स्वतः आचार्य दुसऱ्या शिष्यास पाठ देऊं लागले. त्यांतहि आचार्य प्रवीण झाले. आचार्य मित्र-शिष्यांना सोप्या उदाहरणांनीं अर्थ समजावून देतांना व त्यांची शंकास्थानें अनेक मार्गांनीं आनंदी वृत्तीनें दूर करीत असतांना मित्रशिष्यांना समाधान होई. बाल आचार्यांचे पाठ ऐकावयास अनेक तज्ज्ञ लोक जमत व त्यांच्या मुखांतून प्रशंसोद्गार निघत. अध्ययन व अध्यापन—प्रवीण आचार्यांची कीर्ति फारच लवकर जिकडे तिकडे पसरली. वेदांमध्यें प्रत्यक्ष ब्रह्मदेव, वेदाङ्गांमध्यें गार्ग्य, शास्त्रांतील रहस्य सांगण्यांत बृहस्पती, वेदोक्त कर्मवर्णनांत जैमिनी, तत्त्वज्ञान-विवरणांत मूर्तिमंत व्यास असे ते सर्व लोकांना भासूं लागले.

गुरुगृहीं असतां सर्व सहाध्यायांबरोबर प्रतिदिवशीं भिक्षेस जाऊन ते आपला निर्वाह करीत असत. नित्यनियमाप्रमाणें एके दिवशीं ते आपल्या गुरुबंधूसह भिक्षेस निघाले. जातां जातां एका दरिद्री ब्राह्मणाच्या घरीं गेले. ब्राह्मण घरांत नव्हता. दुपारच्या निर्वाहाच्या विचारांत त्याची साध्वी स्त्री घरांत बसली होती. तिनें डोळ्यांत आसवें आणून दीनवाणीनें आचार्यांची प्रार्थना केली, "महाराज! मी अत्यंत निर्धन व हतभागिनी आहें. आपल्या भिक्षेस घालण्यासारखें आज माझ्या घरांत कांहींच नाहीं. आपल्यासारख्या तेजस्वी कुमारास विमुख दवडणें योग्य नाहीं. मी एक आंवळा देतें. त्याचा आपण स्वीकार करावा व माझ्यावर कृपा करावी." असें म्हणून तिनें परमभक्तीनें आचार्यांस तो आंवळा दिला. ती त्या साध्वी स्त्रीची स्थिति पाहून आचार्यांस दया आली. त्यांनीं तत्काळ लक्ष्मीचा स्तव केला. लक्ष्मी प्रगट झाली. आचार्यांनीं तिला म्हटलें, "या स्त्रीनें भक्तिभावानें मला आंवळा अर्पण केला. या पुण्याईचें फळ या स्त्रीस

मिळालेंच पाहिजे." हें ऐकून लक्ष्मी प्रसन्न झाली व त्या ब्राह्मणाचें घर सोन्याच्या आंवळ्यांनीं भरून टाकलें व ती अंतर्धान पावली.

वेदशास्त्रांत पारंगत होऊन सातव्या वर्षी आचार्य आपल्या घरीं परत आले. अध्ययन अध्यापन करून मातृसेवेंत घरींच काळ घालवूं लागले.

एके दिवशीं त्यांची मातुश्री पूर्णा नदीवर स्नानास गेली. नदीचें पात्र आचार्यांच्या घरापासून फारच दूर होतें. स्नान करून परत येत असतां मध्यान्ह–कालच्या प्रखर उन्हानें त्यांना मूर्च्छा आली. तें पाहून जवळचे लोक धावून गेले व त्यांनीं त्या वृद्ध मातेस घरीं आणून ठेवलें. शीतोपचार करून आचार्यांनीं त्यांना शुद्धीवर आणलें. मातुश्रींची ती दशा पाहून आचार्यांना फारच वाईट वाटलें. नित्य नदी–स्नानाची मातुश्रींची तीव्र इच्छा. ही मातेची इच्छा आयासाशिवाय पूर्ण व्हावी म्हणून आचार्यांनीं नदीची प्रार्थना केली. नदी आचार्यांच्या घराजवळून वाहूं लागली.

हे दोनहि चमत्कार पाहून लोक विस्मित झाले. हा खरा ईश्वरी अंश आहे असें समजून लोक त्यांची कीर्ति गाऊं लागले.

## आचार्यांना केरळ राजाचें निमंत्रण

विद्वत्ता, ब्राह्मणास धनाढ्य करणें व नदीचा ओघ आपल्या दारापुढें आणून सोडणें वगैरे गोष्टी केरळ देशाच्या राजाच्या कानावर गेल्या. तो आचार्यांच्या दर्शनाविषयीं उत्सुक झाला. आपल्या अनेक प्रधानांपैकीं एका शहाण्या प्रधानाबरोबर हत्ती, घोडे, उत्तम पोषाख व जडजवाहीर देऊन आचार्यांस घेऊन येण्याविषयीं पाठविलें. राजानें दिलेलीं वस्त्राभरणें व नजराणा पुढें ठेवून हात जोडून प्रधानानें नम्रपणें विनंती केली, "महाराजांनीं दिलेल्या या सर्व वस्तूंचा स्वीकार करावा व राजगृहापर्यंत येऊन महाराजांना दर्शन द्यावें." हें त्या प्रधानाचें भाषण ऐकून आचार्य म्हणाले, "भिक्षा हेंच आमचें अन्न, कृष्णाजिन हें आमचें वस्त्र. राजापाशीं आम्हांस काय मागावयाचें? कष्टसाध्य अशी त्रिकाल

संध्या करून आम्ही कालक्रमणा करीत आहोंत. आम्हांस हत्ती, घोडा इत्यादिकांची उपाधि काय कामाची? द्रव्याचा आम्हांला काय उपयोग? हें सर्व परत न्यावें. राजास आमचा आशीर्वाद सांगावा." आचार्यांचें निःस्पृह भाषण ऐकून तो प्रधान तसाच परत राजधानीस गेला. त्यानें आचार्यांचा निरोप व आशीर्वाद राजास सांगितला. ही आचार्यांची निस्पृहता पाहून राजा आचार्यांच्या दर्शनाविषयीं अत्यंत उत्कंठित झाला. तो स्वतःच आचार्यांच्या दर्शनास आला. आचार्यांनीं कुशल प्रश्न विचारून राजास तेथें येण्याचें कारण विचारलें. दहा हजार मोहरा आचार्यांपुढें ठेवून विनंती केली. "मी केवळ आपल्या दर्शनासाठींच आलों आहें. मीं कांहीं ग्रंथ लिहिले आहेत तेहि पाहावेत." असें म्हणून आपलीं तीन नाटकें आचार्यांना दाखविलीं. तीं पाहून आचार्यांनीं राजाच्या बुद्धीची प्रशंसा केली. समोर ठेवलेल्या मोहरा पाहून राजास आचार्य म्हणाले, "राजा, द्रव्याची आम्हांस इच्छा नाहीं. तें परत न्यावें. परत नेण्यास संकोच वाटत असेल तर एखादें देवालय बांधावें." ही आचार्यांची अमृतमय वाणी ऐकून राजानें हात जोडून विनंती केली, "मला माझ्यासारखाच एक पुत्र व्हावा." आचार्यांनीं तसा आशीर्वाद दिला. राजास पुत्र झाला.

## आचार्यांच्या भेटीसाठीं कांहीं ऋषींचें आगमन

साक्षात् शंकर भूतलावर अवतार घेऊन आले आहेत हें जाणून अगस्त्य, उपमन्यु आदि कांहीं ऋषी आचार्यांच्या दर्शनासाठीं त्यांच्या घरींच आले. त्यांना पाहतांच आचार्यांनीं आदरपूर्वक सर्वांस वंदन करून, आसनें वगैरे देऊन त्यांची भक्तिभावानें पूजा केली. त्यांच्याशीं मोक्षमार्गासंबंधानें गोष्टी बोलत बसले. हें पाहून आचार्यांच्या मातुश्रींस फारच आनंद झाला. त्या सर्व ऋषिश्रेष्ठाजवळ जाऊन त्यांना वंदन करून त्या म्हणाल्या, "आपल्या आगमनानें आम्ही कृतार्थ झालों.

कलियुगांत आपल्यासारख्या पूज्य ऋषींचें दर्शन दुर्मिळ. माझ्या पुत्रानें अल्प काळांत सर्व विद्या संपादन केल्या व याच्या लीलाहि अद्‌भुत आहेत हें आपण जाणतां. माझा हा पुत्र अल्पायुषी आहे असें सांगण्यांत येतें. त्याचें आयुष्य वाढेल असा एखादा उपाय आहे का?" हे त्या प्रेमळ मातेचे शब्द ऐकून अगस्त्य ऋषी म्हणाले, 'या आपल्या पुत्रास मूलतः सोळाच वर्षें आयुष्य आहे. तथापि भगवान् व्यासांच्या अनुग्रहानें त्याची वृद्धि होऊन तो आणखी सोळा वर्षे या भूमंडळावर राहील. याचें आयुष्य बत्तीस वर्षांचें आहे.' इतकें बोलून सर्व ऋषींनीं आचार्यांचा निरोप घेतला.

## आचार्यांची संन्यास–दीक्षा

'**आ**पला सर्वज्ञ व विद्वान् पुत्र अल्पायुषी आहे' असें सांगून सर्व ऋषी निघून गेले. आचार्यांच्या मातेचें अंतःकरण दुःखानें होरपळून गेलें. मातेस मूर्च्छा आली. शीतोपचारानें मातेस शुद्धीवर आणून आचार्य त्यांना म्हणाले, "आई! या संसाराची स्थिति अशीच क्षणभंगुर नाहीं का? याबद्दल शोक करणें व्यर्थ. हें शरीरहि चंचल आहे. तुझ्या-सारख्या सुज्ञ मातेनें मुळींच शोक करूं नये. ज्याप्रमाणें लाकडाचे ओंडके सागराच्या लाटांनीं एकत्र येऊन मिळतात व पुनः दुसऱ्या लाटेनें भिन्न भिन्न होऊन दूर दिशेला जातात, त्याप्रमाणें हा दारादिकांचा व बांधवांचा समागम केवळ क्षणभंगुर आहे. याकरितां तूं शोक करूं नकोस. हा संसारच जर दुःखमूळ आहे तर तो करावा तरी कशाला? म्हणून माझी अशी इच्छा आहे कीं, चतुर्थाश्रम (संन्यास) घेऊन या या सर्व उपाधींपासून मुक्त व्हावें. ह्याकरितां तूं मला संन्यास घेण्यास आज्ञा दे." आधींच मुलाच्या अल्पायुष्याचें दुःख त्यांत मुलगा संन्यास आश्रमाची इच्छा करीत आहे हें दुसरें दुःख. मोठ्या काकुळतीस येऊन माता म्हणाली, "बाळ, आम्ही तुझ्या लग्नाची इच्छा करीत आहोंत. ही

संन्यासाश्रमाची भलतीच बुद्धि सोडून दे. चारचौघांप्रमाणें गृहस्थाश्रमच करून राहा. गृहस्थाश्रमानंतर संन्यास घ्यावा असें म्हणतात ना? पतीच्या पश्चात् वृद्धापकाळीं मातेचें रक्षण पुत्राशिवाय अन्य कोण करील? मी मरण पावलें असतां माझ्यासंबंधींच्या और्ध्वदेहिक क्रिया तुझ्याशिवाय दुसरें कोण करणार?" असें म्हणत असतां पुनः त्यांना मूर्च्छा आली. आचार्यांनीं मातेस सावध करून गृहकृत्यास लावली. संन्यासाचा व वैराग्याचा बेत आचार्यांनीं आठवे वर्षींच केला.

युक्ति-प्रयुक्तीनें आपले सर्व बेत तडीस न्यावयाचे व आईचें मन कसेंहि करून वळवावयाचें असा दृढनिश्चय आचार्यांनीं केला. मनुष्याचा निश्चय दृढ झाला मग संधीला तरी उशीर काय? तीहि आपोआप चालत येते. त्याप्रमाणें एके दिवशीं योगायोग आला.

घराशेजारच्या नदीस आचार्य स्नानास गेले व पोहूं लागले. तों अकस्मात् एका मगरानें आचार्यांचा पाय धरला. तेव्हां आचार्य मोठ-मोठ्यानें आक्रोश करूं लागले. त्या मुलाच्या दीनवाण्या आरोळ्या ऐकून आचार्यांची माता घाबरून घरांतून बाहेर येऊन पाहते तोंच आचार्यांचा पाय मगरानें धरलेला आहे; ती मगरमिठी सुटण्यासाठीं आचार्य खूप प्रयत्न करीत आहेत, पण मिठी सुटेना. हें पाहून मातुश्रींचे हातपाय गळले. त्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांना हाका मारूं लागल्या. इकडे आणी-बाणीची वेळ येऊन पोंचली. ही संधि साधून आचार्य मोठ्यानें आईस म्हणाले, "या मगरानें पाय सोडण्यास एकच उपाय आहे. तूं जर मला संन्यास घेण्यास आज्ञा देशील तर सत्वर मगर माझा पाय सोडील. नाहींतर हा मी चाललों." हा आर्तस्वर ऐकून कांहींहि होवो, पण माझा मुलगा जिवंत राहो या विचारानें मातेनें दीनवाणीनें संन्यास घेण्यासंबंधीं आचार्यांना अनुज्ञा दिली. तोंच मगरानें आचार्यांचा पाय सोडला व ते झटकन् येऊन मातुश्रींपाशीं उभे राहिले. सुखरूप मुलास पाहून मातेच्या

डोळ्यांतून आनंदाश्रु आले. या गोष्टीवरून आचार्यांनीं मातुश्रींच्या मनांत असें बिंबविलें कीं ' या संसाररूपी नक्रापासून सुटण्यासहि संन्यासाशिवाय दुसरें कांहीं साधन नाहीं. '

त्या दिवशीं भोजन उरकल्यानंतर आचार्यांनीं पुनः संन्यासाची गोष्ट काढली. ' आई ! आपली आज्ञा असावी. संन्यासाश्रमाचे उचितधर्म मला सत्वर केले पाहिजेत. त्यासाठीं मला देशाटनास गेलें पाहिजे. संन्यासाश्रम स्वीकारण्यास योग्य गुरूहि गांठला पाहिजे. ' असें म्हणून संन्यासाश्रम घेऊन सुद्धां मातेचें और्ध्वदेहिक कर्म करीन असें मातेस वचन देऊन त्यांना आपल्या बांधवांच्या स्वाधीन करून संन्यास ग्रहण करण्यासाठीं योग्य गुरु पाहावा यासाठीं ते घरांतून बाहेर पडले.

संन्यास ग्रहण करण्याच्या उत्कंठेनें आचार्य देशसंचार करीत करीत निघाले. नाना प्रकारचीं वनें, नगरें, ग्राम, पर्वत, नद्या त्यांनीं ओलांडिल्या. ठिकठिकाणीं अध्ययनाच्या बळावर अद्वैत मताची स्थापना करीत नर्मदातीरीं आले. तेथील अरण्यांतील एका गुहेंत गोविंदनाथ म्हणून कोणी एक महान् विद्वान् सत्पुरुष राहतात असें ऐकून आचार्य त्यांच्या दर्शनासाठीं गेले.

गोविंदनाथ हे परमविरक्त असून त्यांची कीर्ति फारच अद्भुत होती. त्यामुळें त्यासच गुरु करण्याचा आचार्यांनीं निश्चय केला. त्यांनीं गोविंदनाथांच्या आश्रमांत प्रवेश केला. तो आश्रम फारच रमणीय व पवित्र होता. सृष्टिसौंदर्यानें व्यापलेलें तें स्थान पाहून आचार्यांचें मन प्रसन्न झालें. गोविंदनाथांच्या गुहेस त्यांनीं तीन प्रदक्षिणा घातल्या. मग आंत जाऊन मधुरवाणीनें नाथांची स्तुति केली.

' महाविष्णूचें शय्यास्थान, शंकराचें कंठभूषण, पृथ्वीचा भार आपल्या मस्तकावर ज्यानें धारण केला असा जो शेष त्याचे आपण प्रत्यक्ष अवतार आहांत. आपणांस शुकशिष्य गौडपादापासून परिपूर्ण ब्रह्मज्ञान

प्राप्त झालेलें आहे. तेव्हां आपणापासून ब्रह्मज्ञान प्राप्त व्हावें या विशिष्ट उद्देशानें मी आपणांस शरण आलों आहें. करितां माझ्यावर कृपा करावी.'

ही गंभीर व अधिकारयुक्त वाणी ऐकून गोविंदनाथांनीं आचार्यांस विचारलें कीं "तूं कोण आहेस?" तेव्हां आचार्य म्हणाले, "मी शिवस्वरूप आहें." हें ऐकून गोविंदनाथांचें हृदय उमललें. याप्रमाणें परस्परांचें भाषण झाल्यानंतर आचार्यांनीं भक्तिभावानें गुरूची पाद्यपूजा केली. थोडे दिवस गुरुसेवा झाल्यानंतर गोविंदनाथांनीं आचार्यांना उपदेश देऊन संन्यासदीक्षा दिली.

आचार्यांनीं सद्गुरुसमागमांत कांहीं दिवस घालविल्यानंतर एके दिवशीं गोविंदनाथांनीं त्यास सांगितलें कीं, "तुझा अवतार वैदिक धर्म स्थापनेकरितां आहे. यासाठीं तूं काशीस जाऊन राहा. तेथें शारीरभाष्य तयार कर. याप्रमाणें मला व्यासानीं सांगितलें आहे. तेव्हां तूंच तो शंकराचा अवतार. जगदुद्धार करण्याचा यत्न कर. तुला तेंच स्थान योग्य आहे. तेथें तुला सर्व देवता साहाय्य करतील." याप्रमाणें सांगून गोविंदनाथांनीं आचार्यांना आशीर्वाद देऊन निरोप दिला.

## आचार्यांचें शिष्यचतुष्टय

**सनंदन—पद्मपाद—**

श्रीमच्छंकराचार्य काशीमध्यें असतां चौल देशाचा, कावेरी तीरावर राहणाऱ्या तेजस्वी ब्राह्मणाचा तरुण मुलगा आचार्यांस नमस्कार करून उभा राहिला. त्यानें संपूर्ण वेदाध्ययन केलेलें होतें. त्यास संसार-सागर तरून जाण्याची इच्छा होती. तो जन्मतःच वैराग्य-संपन्न होता. त्यास आचार्यांनीं म्हटलें, "तूं कोण आहेस?" त्या मुलानें आपली इच्छा व्यक्त केली, "पृथ्वीवर जेथें साधु भेटतील तेथें जाऊन त्यांचीं दर्शनें घ्यावीं. मी देशपर्यटन करीत असतां मला आपलें दर्शन झालें. आज मी

कृतार्थ झालों. माझ्या गुणदोषाचा विचार न करतां मला संसारसागरांतून मुक्त करावें." हें भाषण ऐकून आचार्य संतुष्ट झाले. आपल्याजवळ ठेवून घेऊन त्यास त्यांनीं संन्यासदीक्षा दिली. त्यास आपला शिष्य करून त्याचें नांव सनंदन असें ठेवलें. हाच आचार्यांचा पट्टशिष्य होय. आचार्यांनीं केलेले सर्व ग्रंथ या शिष्यास पढविले. त्याचीहि गुरूवर अढळ भक्ति असल्यानें त्यानें ती सर्व विद्या सत्वर ग्रहण केली. त्याची भक्ति कितपत आहे याची पूर्ण परीक्षा करावी व ती इतर शिष्यांना दाखवावी म्हणून आचार्य आपल्या शिष्यांसह पैलतीरीं गेले. सनंदन अलीकडच्याच तीरावर होता.आचार्यांनीं त्यास पलीकडे येण्याची आज्ञा केली. गुरूंची आज्ञा ऐकून पलीकडे तसाच जाण्याचा त्यनें निश्चय केला. "कारण संसाररूपी अथांग सागरांतून तारण्यासाठीं जर श्रीगुरु समर्थ आहेत, तर या अल्प जलाशयांतून ते तारणार नाहींत कसे?" असें म्हणून भागीरथीच्या प्रवाहावर पाय ठेवून पलीकडे जाऊं लागला. तों असा चमत्कार झाला कीं जेथें सनंदन पाय ठेवी तेथें त्याला आधारभूत एक कमल निर्माण होई. त्या कमळावर पाय ठेवीत सनंदन मोठ्या आनंदानें पैलतीरावर गेला. ही गुरुभक्ति पाहून आचार्यांना मोठा आनंद झाला. त्यांनीं त्यास दृढालिंगन दिलें. तेव्हां आचार्यांनीं त्याचें नांव 'पद्मपाद' असें ठेवलें. या प्रकारानें आचार्यांचे शिष्य विस्मित झाले.

## मंडनमिश्र सुरेश्वराचार्य

कुमारीलभट्टांच्या उपदेशाप्रमाणें आचार्य माहिष्मती नगरींत येऊन दाखल झाले. त्या नगरीसमीप एक रमणीय बाग होता. त्या ठिकाणीं उतरून स्नानादिक आन्हिक कृत्यें उरकून दोन प्रहर दिवस येण्याच्या सुमारासमंडन पंडिताच्या घराचा शोध करीत चालले. त्यांना पंडिताच्या दोन दासी भेटल्या. त्यांनीं त्यांचें घर दाखविलें. त्या दिवशीं मंडनपंडितांच्या घरांत श्राद्धतिथि होती. पंडित श्राद्ध-संकल्पाच्या तयारींत होते. घराचें

पुढील दार बंद होतें. योगबलानें आचार्य आंत गेले. ते निमंत्रित ब्राह्मणाच्या शेजारीं बसले.

मंडनमिश्र कर्ममार्गी तर आचार्य संन्यासी. श्राद्धकर्माच्या ठिकाणीं अनाहूत संन्यासी बसलेला पाहून मंडनपंडितांस फारच राग आला. त्यानें तिरस्कारबुद्धीनें आचार्यांशीं भाषण केलें. उभयतांचा जोराचा वाद झाला. श्राद्धास बसलेल्या दोनहि ब्राह्मणांनीं पंडितांस शांत करून यतीस योग्य ती भिक्षा देण्याची आज्ञा केली. आचार्यांनीं वादविवादाची भिक्षा मागितली. त्या वादविवादांत दोघांपैकीं जो कोणी जिंकला जाईल त्यानें दुसऱ्याचें शिष्यत्व पत्करावें असें ठरलें.

वादविवादासाठीं मोठें सभास्थान तयार झालें. सभेचें अध्यक्षस्थान पंडितपत्नी सरस्वतीनें स्वीकारावें असें ठरविलें. पंडितानें आपल्या गांवांतील सर्व पंडितांस व सभ्य लोकांस निमंत्रणें केलीं. सभेच्या मध्यभागीं एक उच्चासन मांडून दोहों बाजूंस दोन तशींच उच्चासनें ठेविलीं. आचार्य आपल्या शिष्यगणांसह सभास्थानीं आले. मंडनपंडित आपल्या पत्नीसह सभास्थानीं दाखल झाले. सर्वानुमतें सभेचें अध्यक्षस्थान सरस्वतीनें स्वीकारिलें. आचार्यांनीं व पंडितांनीं वादाच्या संबंधानें प्रतिज्ञा केल्या.

आचार्य बोलले—"ब्रह्म हेंच सत्य आहे हें मी सिद्ध करून देतों. यांत जर माझा पराभव झाला तर मी ही भगवीं वस्त्रें टाकून संन्यासधर्म सोडून गृहस्थाश्रम पत्करीन. या वादांत कोणाचा जय झाला व कोणाचा पराभव झाला याचा निर्णय पंडितपत्नी सरस्वतीनें करावा. तो आम्हां उभयतांसहि मान्य आहे." पंडित बोलले—"वेदाचा पूर्वभाग कर्मकांड हाच प्रमाण असून तोच सर्वांना कारण आहे हें मी सिद्ध करून देतों. यांत जर माझा पराभव होईल तर मी गृहस्थाश्रमाचा त्याग करून काषाय वस्त्र व संन्यास यांचा स्वीकार करीन. याचा निर्णय सभाध्यक्ष सरस्वतीनें करावा. तो मला मान्य आहे."

सरस्वतीनें अध्यक्षस्थान स्वीकारिलें. उभयतांच्या गळ्यांत तिनें पुष्प-माला घातली आणि म्हणाली, "ज्याची माला प्रथम कोमेजून जाईल त्याचा पराभव झाला असें मी समजेन." आचार्य व मंडनपंडित यांचा वाद दीर्घकाळ चालला. आचार्यांनीं अनेक प्रकारें श्रुति (वेद) प्रमाणांनीं ब्रह्मसिद्ध करून अद्वैत मत स्थापन केलें व तें सरस्वतीलाहि मान्य झालें. इतक्यांत मंडनपंडिताच्या गळ्यांतील पुष्पमाला सुकली. हा चमत्कार पाहून सरस्वतीनें आचार्यांचें मत प्रमाण मानलें. 'आचार्यांचा विजय झाला' असा तिनें निर्णय दिला. 'संसारसागरांत निमग्न होऊन जे लोक गटकळ्या खात आहेत त्यांचा उद्धार करण्याकरितां साक्षात् शिवांनीं हा आचार्य अवतार धारण केला आहे, यांना शरण जा' असें सभास्थानीं असलेल्या जैमिनींनीं सांगितलें. मंडनपंडितांनीं आचार्यांस वंदन केलें व संन्यास घेण्याची इच्छा प्रदर्शित केली. आचार्यांनीं त्यांची इच्छा मान्य केली. विश्वजित् याग करून सर्वस्व दान करून मंडनपंडितांनीं आचार्यांपासून विधियुक्त संन्यास घेतला. आचार्यांनीं त्याचें नांव 'सुरेश्वराचार्य' असें ठेविलें.

आचार्यांना तुंगभद्रा तीरावरील श्रीक्षेत्र शृङ्गेरी हें स्थान फारच पसंत पडलें. तेथें त्यांनीं आपला आद्यमठ स्थापिला. तेथें सुंदर पाषाणाचें देवालय बांधून शारदापीठाची स्थापना केली. आपल्या पश्चात् सुरेश्वराचार्यांस त्या मठाचें आधिपत्य दिलें.

## हस्तामलक

आचार्य सिद्धस्थानीं गेले. तेथील मूकांबिकेच्या मंदिरांत जाऊन तिची पूजा व स्तव करून श्रीबलि नामक ग्रामाकडे आले. हा ग्राम ब्रह्मवृंदास इनाम दिलेला होता. आचार्य तेथें कांहीं दिवस राहिले. त्या गांवांत ब्राह्मणांची वस्ती मोठी होती. अग्निहोत्र व्रत पाळून सर्व ब्राह्मण सदाचारानें राहात होते. ब्राह्मण नेहमीं वेदपठण करीत असत. त्या

गांवाच्या मध्यभागीं श्रीशंकराचें देवालय होतें. त्यामुळें गांवास विशेष शोभा आली होती.

त्या गांवांत प्रभाकर म्हणून एक मोठा स्नानसंध्याशील विद्वान् ब्राह्मण राहात होता. तो मोठा कुटुंबवत्सल होता. त्यास एकच पुत्र होता. पुत्राचें रूप मदनासारखें होतें. तेज सूर्यासारखें होतें. तो कोणाशीं कांहींच बोलत नसे. विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देत नसे. आपल्याच मनाशीं गुंगत बसणें अगर डोळे मिटून ध्यानस्थ बसणें हा त्याचा नित्याचा व्यवसाय होता. तो नेहमीं भ्रमिष्टाप्रमाणें वागे. ही पुत्राची मूढवृत्ति पाहून ब्राह्मण चिन्ताक्रान्त असे. हा काय मूळचाच खुळा आहे, का याला भूतबाधा झाली आहे, का याच्यामागें कांहीं ग्रहांची पीडा आहे, का पूर्वकर्मानें याला अशी स्थिति प्राप्त झालेली आहे अशा विविध विचारांत तो ब्राह्मण होता. इतक्यांत आपल्या गांवांत कोणी संन्यासी शिष्यपरिवारांसह आलेले आहेत ही बातमी त्या ब्राह्मणास समजली. प्रभाकर ब्राह्मण आपल्या या मूढ पुत्रास घेऊन आचार्यांच्या दर्शनास आला. ब्राह्मणानें आचार्यांस वंदन केलें व मुलासहि वंदन करण्यास सांगितलें. त्या मुलानें आचार्यांचे पाय घट्ट धरिले. मुलगा आपले पाय सोडीना हें पाहून आचार्यांनीं त्याला आपल्या हातानें उठविलें. ब्राह्मणानें आचार्यांस मुलासंबंधीं सर्व हकीकत सांगितली. 'आठव्या वर्षी याचें उपनयन केलें. याचें अध्ययन नाहीं व कोणाशींहि हा खेळताहि नाहीं. कोणी याच्यावर रागावलें अगर यास मारिलें तरी हा रागावत नाहीं. मनास वाटेल तर जेवतो, नाहीं तर उपवासानें काळ घालवितो.'

त्या ब्राह्मणाचें भाषण ऐकून आचार्यांनीं त्या मुलास विचारिलें, "मुला, अशा जड वृत्तीनें राहणारा तूं कोण आहेस?" आचार्यांचें तें प्रेममय भाषण ऐकून मुलानें उत्तर दिलें, "हे गुरो, मी स्वतः जड नाहीं; शोक, मोह, क्षुधा, तृषा, जरा, मृत्यु या सहांनीं मी रहित असून उत्पत्ति, स्थिति, वृद्धि, क्षय, नाश व विपरिणाम या सहा विकारांनीं रहित व

अत्यंत सुखाचें स्थान जें परब्रह्म तें मी आहें." असें सांगितलें. त्या अज्ञान म्हणून मानलेल्या मुलानें तेथें सर्वांसमक्ष बारा श्लोकांनीं आत्मतत्त्वज्ञानाचें थोडक्यांत विवेचन केलें. ती त्याची गूढ बुद्धिमत्ता पाहून व ते मननीय श्लोक ऐकून आचार्य प्रसन्न झाले व म्हणाले, "या बारा श्लोकांनीं आत्मतत्त्वाचा बोध हातांतील आंवळ्याप्रमाणें (आमलकवत्) स्पष्ट होतो. हे मुला, तुला आजपासून लोक 'हस्तामलक' म्हणतील. आचार्यांनीं विचार केला कीं हा कोणी तरी पूर्वजन्मींचा योगी असेल. मोठ्या प्रेमानें त्या मुलास जवळ घेऊन त्याच्या मस्तकावर आचार्यांनीं हात ठेविला. आचार्यांनीं प्रभाकर ब्राह्मणास म्हटलें, "प्रपंचांत तुम्हांला या पुत्राचा कांहींच उपयोग व्हावयाचा नाहीं. आपली मर्जी असेल तर यास आमच्या स्वाधीन करा. म्हणजे तो आपला देह सार्थक तरी करील." प्रभाकर ब्राह्मणानें आचार्यांच्या आज्ञेनुसार त्या पुत्रास त्यांच्या स्वाधीन केलें. आचार्यांनीं त्या पुत्राचा स्वीकार केला.

## आनंदगिरी–तोटकाचार्य

आचार्यांजवळ अनेक शिष्य होते. त्यांत एक गिरी म्हणून शिष्य होता. तो नेहमीं आचार्यांजवळ राहून त्यांची सेवा करीत असे. आचार्यांना स्नानास पाणी देणें, त्यांचीं वस्त्रें धुणें, त्यांची पूजेची तयारी करून देणें वगैरे कामें तो स्वतः करीत असे. त्याच्या भक्तियुक्त सेवेनें आचार्य त्याच्यावर अगदीं प्रसन्न होते. पद्मपाद आदि सर्व शिष्य आचार्यांजवळ पाठ घेत असतां हा गिरी आचार्यांचीं वस्त्रें धुण्यासाठीं नदीवर गेला होता. परत येण्यास उशीर झाला. आचार्य सर्व शिष्यांस म्हणाले, 'जरा थांबा. इतक्यांत गिरी येईल.' तेव्हां ज्ञानगर्वानें पद्मपाद म्हणाले, "तो कशाला? त्याला काय समजतें? तो असला काय नसला काय सारखाच." आचार्यांनीं विचार केला कीं, "हा यांचा ज्ञानाचा गर्व दूर झाला पाहिजे." नदींतून परत आल्यानंतर त्याला आचार्यांनीं मनानेंच उपदेश केला व त्याच्यावर कृपा केली. त्याला लगेच सर्व विद्या अवगत झाल्या.

त्यानें तोटकवृत्तानें आचार्यांचा स्तव करून सर्व उपनिषद् भागाचें प्रतिपादन केलें.

गिरीचें हें काव्य ऐकून सर्व शिष्यांना अतिशय विस्मय वाटला. कारण त्याला कांहीं एक समजत नव्हतें. ही केवळ गुरुकृपा होय अशी सर्व शिष्यांची खात्री पटली. पद्मपादादि शिष्यांचा गर्व नष्ट झाला. तोटकवृत्तानें आत्मवृत्त कथन केल्यानें पुढें त्याचें नांव तोटकाचार्य असें प्रसिद्धीस आलें. आचार्यांच्या मुख्य शिष्यांत याची गणना झाली. हिमालयांतील बदरिकाश्रमाच्या मठांवर याची योजना केली.

## शिव व आचार्य संवाद

आचार्य श्रीक्षेत्र काशी येथें असतां एके दिवशीं सर्व शिष्यांसह गंगास्नानास चालले होते. आचार्यांची परीक्षा घेण्यासाठीं श्रीशंकर चांडाळाच्या रूपानें बरोबर चार कुत्रे घेऊन आचार्य चालले होते त्याच मार्गानें चालले. शिव मुद्दाम आचार्यांजवळून जाऊं लागले. हें पाहून त्या चांडाळास आचार्य म्हणाले, "जरा बाजूस हो, मला शिवूं नको.' हें ऐकून त्या चांडाळानें थोडेसें हास्य करून म्हटलें–"यतिवर्य, ब्रह्म एक, अद्वितीय, निरवयव असें असून तें संगरहित आहे. सत्य, ज्ञान, अनंत असें ब्रह्माचें स्वरूप आहे. आत्माहि अद्वितीय असल्याचें वेदतत्त्वज्ञ बोलतात. आपण वेदान्त्यांमध्यें श्रेष्ठ आहांत. आपणांमध्यें ही भेदबुद्धि असावी हें आश्चर्य होय. आपलें काषायवस्त्र, दंडकमंडलु हीं सर्व गृहस्थांना फसविण्यासाठीं आहेत असें मला वाटतें. आतां 'दूर हो' असें आपण म्हणतां तर तें आत्म्याला कां शरीराला? आत्म्याला असेल तर आत्मा भिन्न नाहीं सर्व आत्मे एकच आहेत. शरीराला असेल तर शरीराच्या अंतर्रचनेप्रमाणें शरीरहि भिन्न नाहीं. हें सर्व आपण जाणतां. तेव्हां याचें उत्तर काय? ब्राह्मणाच्या शरीरांतील व चांडाळाच्या शरीरांतील आत्मा एकच आहे. आणि देहादिकांच्या ठिकाणीं आपल्या-

सारख्या तत्त्वज्ञान्यांना अहंभाव असणें अगदींच अयोग्य. आपण म्हणाल लोकरीतीला अनुसरून मीं 'दूर हो' असें म्हटलें; पण मुक्तिमार्गांत पोंचलेल्या आपल्यासारख्या सत्पुरुषांना लोकसंग्रहासारख्या क्षुद्र गोष्टींची पर्वा करणें योग्य नाहीं. आपल्यासारख्या तत्त्वज्ञान्यांनीं भगवंताच्या मायारूप इंद्रजालांत गुरफटून फसणें अगदींच अयोग्य."

हें चांडाळाचें प्रमाणसिद्ध भाषण ऐकून आचार्य चकित झाले. आणि म्हणाले, "आपल्या वचनाप्रमाणें हा अंत्यज आहे व हा ब्राह्मण आहे, ही जी भेदबुद्धि आहे तिचाहि मी आजपासून त्याग करीत आहें. आपण खरोखर अंत्यज नसून कोणीतरी श्रेष्ठज्ञानी पुरुष आहांत असें मी समजतों."

"आपलें भाषण सत्य आहे." अभेदबुद्धि होणें हें कर्म फार कठीण आहे. जो कोणी हें ब्रह्मांड व आत्मा हीं एकरूपच असें बुद्धीच्या प्रभावानें मानतो तो ब्राह्मण असो अगर चांडाळ असो, तो वंदनीय आहे यांत शंका नाहीं. जो ब्रह्मदेव आदिकरून मुंगीपर्यंत एकच चैतन्य समजतो व ज्याचा मीपणा नष्ट झाला तो कोणीहि असो, त्या तत्त्ववेत्याला मी गुरुस्थानीं मानतों"

हें आचार्यांचें भाषण ऐकून श्रीशंकरानें आपलें चांडाळ रूप टाकून खऱ्या रूपानें आचार्यांस दर्शन दिलें. तेव्हां आचार्यांनीं भक्तिभावानें व आनंदानें अष्टमूर्ति शंकराचा स्तव केला.

यानंतर शंकर बोलले, "व्यासाप्रमाणें आपणहि माझ्या कृपेस पात्र आहांत. वेदांचा अर्थ निश्चित कळण्यासाठीं आपण त्यावर भाष्य लिहावें. भेदाभेदवादी भास्कर, शाक्तमत प्रस्थापक अभिनवगुप्त, भेदवादी नीलकंठ, शैववादी गुरु प्रभाकर, गुरुमतानुयायी मंडन इत्यादि जे भिन्नाभिन्न मताला अनुसरणारे पंडित आहेत त्यांना जिंकून सर्व पृथ्वीवर अद्वैतमत स्थापन करावें. धर्माच्या संरक्षणार्थ शिष्यगण वाढवून ठिकाठिकाणीं योग्य शिष्यांची योजना करावी. यानंतर आपलें अवतारकार्य संपवून मजकडे यावें."

## कापालिकाचा वध

श्रीमत् शंकराचार्य श्रीशैल्य पर्वतावर असतां त्यांच्याकडे एके दिवशीं एक कपटवेष धारण केलेला व बाह्यात्कारें अत्यंत सभ्य दिसणारा असा एक भैरवाचा भक्त कापालिक नांवाचा गृहस्थ आचार्यां-जवळ आला. त्या वेळीं आचार्य एकान्तांत बसले होते. आचार्यांजवळ जाऊन त्यांची रसभरित स्तुति करून त्यानें हळूच विनंती केली.

" आपला अवतार परोपकारासाठीं आहे. आपल्याकडून याचक कधींहि विमुख गेला नाहीं. मी कापालिक भैरव याला संतुष्ट करण्यासाठीं प्रयत्न करतों. त्या भैरवास संतुष्ट करण्यासाठीं मला एक नरकपाल पाहिजे. तें सार्वभौम राजाचें अगर महान् योग्याचें हवें. सार्वभौम राजाचें दुर्मिळ. आपण महान् योगी आहांत. आपण आपलें कपाल देण्यास समर्थ आहांत. आपलें कपाल मिळालें तर आपली कीर्तीहि वाढेल व माझें कामहि होईल. जगांत अनेक संकटें व क्लेश आढळतात त्यांच्या नाशासाठीं हा माझा प्रयत्न आहे. "

हें त्याचें भाषण ऐकून आचार्य म्हणाले, " ठीक आहे. तुझें कर्म निंद्य आहे असें मी म्हणत नाहीं व त्यापासून माझें अनहित आहे असें मला वाटत नाहीं. मी आपलें मस्तक देण्यास केव्हांहि तयार आहे. पण माझे शिष्य तुला प्रशस्तपणें मस्तक घेऊं देणार नाहींत. एकान्तस्थळीं तूं व मी जाऊं व तेथें मी समाधि लावीन. मी समाधिस्थ असतां माझें मस्तक घे. "

दुसऱ्या दिवशीं गळ्यांत हाडांची माळ घालून, हातांमध्यें त्रिशूळ घेऊन मद्यपान करून तो आचार्यांकडे आला. जवळ कोणी शिष्य नाहींत हें पाहून आचार्य व कापालिक एकांतीं गेले. आचार्यांनीं समाधि लावली. आचार्यांचें मस्तक उडविण्यासाठीं कापालिक खड्ग बाहेर काढून घाव घालणार तोंच पद्मपादानें योगबलानें जाणलें कीं कापालिक आचार्यांचा नाश करीत आहे.

तेव्हां पद्मपादानें नरसिंहाचें ध्यान केलें. त्याच्या देहांत नरसिंहाचा संचार होऊन तो धावत दुष्टकृत्य करणाऱ्या कापालिकाजवळ आला. त्या दुष्ट व घातक कापालिकाला धरून आपल्या तीक्ष्ण नखांनीं त्यास फाडून, कपाळ फोडून त्याचे तुकडे तुकडे केले व भयंकर सिंहनाद केला. तो शब्द ऐकून 'कोण आहे ? काय आहे ?' म्हणून सर्व शिष्य तेथें जमले आणि पाहतात तोंच सारा निराळा भयंकर प्रकार. आचार्य समाधिस्थ आहेत. कापालिकाचें शरीर छिन्नविच्छिन्न होऊन खालीं पडलें आहे. रक्ताचा पाट चालला आहे. नरसिंहाची मूर्ति अक्राळविक्राळ मुख पसरून, आरक्त नेत्र वासून, जिव्हा हलवीत भयाण रूपानें संचार करीत आहे.

आचार्यांची समाधि उतरली. त्यांनीं ती भव्य मूर्ति पाहिली. नरसिंहाचा स्तव केला व म्हणाले, "या देहाच्या रक्षणासाठीं आपण प्रगट झालांत. तें कार्य झालें. या रूपाचा उपसंहार करावा."

तें नरसिंहाचें उग्र स्वरूप नाहींसें होऊन पद्मपाद आपल्या पहिल्या स्वरूपानें दिसूं लागले.

## मृत ब्राह्मणपुत्रास उठविलें

आचार्य तीर्थयात्रा करीत गोकर्ण क्षेत्रास आले. तेथें त्यांनीं शंकरास वंदन करून त्याचा स्तव केला. तेथें तीन दिवस मुक्काम करून सर्व शिष्यांसह आचार्य हरिशंकर स्थळीं आले. तेथें ऐक्यबुद्धीनें उभय देवांचा स्तव केला. तेथून जवळ असलेल्या मूकांबिकेच्या स्थानास जाण्यास निघाले.

तों मार्गांत एका ब्राह्मणाचा एकुलता एक पुत्र मृत झाल्यामुळें त्याचें प्रेत मांडीवर घेऊन मातापितरें मोठ्यानें आक्रोश करीत होतीं. पाषाणहृदयी मानवाच्या हृदयासुद्धां पाझर फुटावा असा त्यांचा आक्रोश होता. मग दयार्द्र आचार्यांच्या हृदयाची स्थिति काय वर्णावी ! आचार्यांनीं दुःखी मातापितरांस सर्व कांहीं विचारलें. हा पुत्र सजीव व्हावा व दुःखी

पितरांना आनंद व्हावा अशी आचार्यांनीं इच्छा केली. आचार्य तो मृत पुत्र योगबलानें सजीव करणार तोंच आकाशवाणी झाली.

"मृताला सजीव करण्याचें ज्याच्या अंगांत सामर्थ्य आहे, त्यानें दुसऱ्यावर दया करणें, हें त्यालाच दुःखद होतें." यावर आचार्यांनीं उत्तर दिले, "त्रैलोक्याचें संरक्षण करण्यास जो समर्थ असेल त्यालाच हें बोलणें शोभतें. आपण सर्वांचें संरक्षण करण्यास योग्य आहांत. तरी कृपा करून या उभयतांचा शोक दूर करावा." इतकें आचार्य बोलत आहेत तोंच तो मुलगा उठून बसला. तेथें जमलेल्या सर्व लोकांसहि आनंद झाला व या आचार्यांच्या शक्तीनें सर्व लोक चकित झाले.

## मातुश्रींचा अंत्यविधि

'आई, तूं जर व्याधिग्रस्त होऊन तुझा अंतकाल समीप आला असें तुला वाटेल, तर त्या वेळीं माझें स्मरण कर म्हणजे मी तत्काळ तुझ्याजवळ येईन व तुझें और्ध्वदेहिक कृत्य मी स्वतः करीन. तूं कांहीं काळजी करूं नकोस.' असें सांगून आचार्य गुरु शोधण्यासाठीं घरांतून बाहेर पडले व ते नर्मदातीरीं आले. ही गोष्ट मागें आलीच आहे.

शृङ्गेरी येथें आचार्य एक वेळ ध्यानस्थ असतां त्यांच्या ध्यानांत आलें कीं आपली माता अगदीं आसन्नमरण झाली असून आपला सारखा ध्यास करीत आहे. हें मनांत येतांच आचार्यांनीं ध्यानाचें विसर्जन केलें. आकाशमार्गानें आपल्या मातेजवळ जाऊन त्यांना वंदन करून म्हणाले, "आपण स्मरण केल्याप्रमाणें मी आलों आहें. मला आज्ञा करावी."

पुत्राचें मुख पाहून मातुश्रींच्या डोळ्यांत आनंदाश्रु आले. अशक्ततेनें त्यांना बोलवत नव्हतें. तरी मोठ्या उत्साहानें त्या म्हणाल्या, 'मला आतां हें जीर्ण शरीर नकोसें वाटूं लागलें आहे. तर माझा योग्य संस्कार करून मला उत्तम अशा पुण्यलोकास पाठवा" ब्रह्मानंदाची प्राप्ति आपल्या मातेस व्हावी या विचारानें आचार्यांनीं आपल्या मातेस ब्रह्मोपदेश केला.

ब्रह्मज्ञान समजून घेण्याची शक्ति त्या बिचारीच्या अंगांत कोठून येणार? त्या म्हणाल्या, ' तुझें ब्रह्म हें निर्गुण निराकार आहे. तें मला समजत नाहीं. याकरितां मला सगुण ब्रह्माचा उपदेश कर."

आचार्यांनीं शंकराचा स्तव केला. शंकरांनीं आचार्यांच्या मातेस घेऊन येण्यासाठीं आपले दूत पाठविले. पण शंकर तमोगुणी असल्यानें त्याच्या दूताबरोबर जाण्याचें तिनें नाकारिलें. आईच्या आज्ञेप्रमाणें आचार्यांनीं भगवान् विष्णूचा स्तव केला. महाविष्णु प्रसन्न झाले. त्यांनीं आपल्या दूतास पाठविलें. इतकेंच नव्हे तर स्वतः विष्णूहि तेथें आले. भगवान् विष्णूंनीं आणलेलें तें दिव्य विमान पाहून मातुश्रींस आनंद झाला. त्या विमानांत बसून विष्णूचें ध्यान करीत, अनेक लोक पाहात मातुश्री वैकुंठास गेल्या. त्यांचा जड देह भूमीवर पडला. और्ध्वदेहिक क्रिया करणें संन्यास-आश्रमास विरुद्ध असतांना सुद्धां आचार्यांनीं इतर बांधवांची पर्वा न करितां मातेच्या सर्व और्ध्वदेहिक क्रिया स्वतः केल्या. आपल्या घराच्या परसांतील आवारांतच मातेचें दहन केलें. आचार्य कांहीं दिवस आपल्या गांवींच राहिले.

## क्रकचाचा वध

आचार्य श्रीवेंकटेशगिरीला गेले. तेथील राजानें आचार्यांचा मोठा सत्कार करून पूजा केली. नंतर आचार्य कर्नाटकांत जाण्यासाठीं निघाले. त्यांच्या बरोबर मेदिनीपुराचा राजा सुधन्वा होता. कर्नाटकांत आचार्यांच्या कीर्तीचा द्वेष करणारे व भैरवाची उपासना करणारे कापालिक महा क्रूर लोक होते. कापालिकास जिंकण्यासाठीं आचार्य आपल्या सर्व शिष्यांसह उज्जयिनीला आले. आचार्यांची स्वारी आपल्या देशांत आली आहे व त्यांच्या जवळ मोठा शिष्यसमूह आहे असें ऐकून कापालिकांचा राजा 'क्रकच' अंगास चिताभस्म लावून हातांत नरकपाल घेऊन आचार्यांकडे आला व मोठ्या गर्वानें म्हणाला, ' हे संन्याशा, तूं भस्म लाविलें

आहेस हें ठीक आहे. हातांत पवित्र नरकपाल घ्यावयाचें सोडून हें भिकार खापर कशाला घेतले आहेस? कपाली भैरवाची उपासना तूं कां करीत नाहींस?' हीं कटुवचनें ऐकून हा कोणीतरी क्षुद्र व कुत्सित पुरुष दिसतो असें समजून सुधन्व्यानें त्यास तेथून हाकून दिलें. तेव्हां त्यास मोठा राग आला. भिवया चढवून, दांत-ओठ खाऊन, डोळे लाल करून हातांतील तीक्ष्ण शस्त्र वर उचलून मोठ्या आवेशानें म्हणाला, "तुमचीं सर्वांचीं मस्तकें या तीक्ष्ण शस्त्रानें जर तोडून टाकलीं नाहींत तर नांवाचा 'क्रकच' नव्हे." असें म्हणत तो निघून गेला. आपल्या सर्व भैरव उपासकांस एकत्र करून त्यांना सर्व प्रकारचीं शस्त्रें देऊन आचार्यांच्या नाशासाठीं पाठविलें. सुधन्वा राजानें त्या सर्वांचा नाश केला. कांहीं कापालिक निराळ्या मार्गांनीं येऊन आचार्य शिष्यांस त्रास देऊं लागले. सर्व शिष्य आचार्यांना शरण येऊन म्हणाले, 'आमचें रक्षण करा.' एका हुंकारानें सर्व कापालिकांचा आचार्यांनीं नाश केला. आपल्या सर्व सैन्यांचा नाश झाला हें पाहून क्रकचास फारच राग आला. हातांत मद्यानें भरलेलें नरकपाल घेऊन त्यांतील अर्धें मद्य पिऊन आचार्यांजवळ आला व त्यानें आपलें दैवत भैरव याचें ध्यान केलें. भैरवमूर्ति प्रगट झाली. क्रकच भैरवास म्हणाला, "आचार्य व आचार्य-शिष्यांचा वध करावा. यांनीं माझ्या सर्वस्वाचा नाश केला आहे." हें क्रकचाचें भाषण ऐकून भैरव म्हणाला, "हा साक्षात् माझाच अवतार होय. तूं या माझ्या अवताराचा द्रोह केला आहेस. आचार्य आणि मी भिन्न नाहीं. हा तुझा मोठा अपराध होय. याकरितां तुलाच शासन मिळालें पाहिजे." असें म्हणून भैरवानें त्या क्रकच्याचा वध केला व आचार्यांना म्हटलें, 'हे अन्य कापालिक माझे भक्त आहेत. त्यांना ब्राह्मणाचारसंपन्न करावें." सर्व कापालिक आचार्यांना शरण आले. पद्मपादादि शिष्यांनीं त्यांना ब्रह्मकर्माचा मार्ग सांगितला. भैरव स्वर्लोकीं गेला.

# आचार्यांचे ग्रंथ

गुरु गोविंदनाथांची आज्ञा घेऊन आचार्य श्रीक्षेत्र काशीस आले. तेथें गुरु आज्ञेनुसार ब्रह्मसूत्रावरील भाष्यांचा प्रारंभ केला. श्रीशंकरानें चांडालरूपानें आचार्यांची परीक्षा घेऊन आचार्यांना स्वरूप दाखवून शारीर-भाष्यासंबंधीं आज्ञा केलीच होती. याप्रमाणें हें कार्य करीत शिष्यांसह फिरत फिरत ते बदरिकाश्रमीं गेले. तेथें कांहीं दिवस राहून प्रथम गंभीर, भव्य, मधुर असें ब्रह्मसूत्रावरील भाष्य समाप्त केलें. नंतर ब्रह्मविद्याप्रतिपादक जीं ईश, केन, कठ, प्रश्न, मुंड, मांडुक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्य इत्यादि दहा उपनिषदांवर भाष्यें लिहिलीं. नंतर महाभारतांतील सकल वेदार्थसारभूत जी श्रीमद् भगवद्गीता तिच्यावर भाष्य लिहून भारतांतील सनत्सुजातीय यावर व्याख्या केली. विरक्ति उत्पन्न झालेले यति अविवेक पाशापासून मुक्त व्हावेत या हेतूनें ‘ उपदेशसाहस्री ’ आदि करून वेदान्त-प्रतिपादक अनेक ग्रंथ केले. अशा प्रकारें शंकराचार्यरूपी सन्मताचा उदय होतांच कुतर्क वादरूपी अंधकार नाहींसा झाला व जिकडे तिकडे ज्ञान-प्रकाशाची प्रभात फांकली. आपला शिष्य सुरेश्वराचार्य यास आपल्या भाष्यावर वार्तिकें (टीकारूप व्याख्यान) करण्याची आज्ञा केली. या सोप्या भाषेंतील टीकारूपी व्याख्यानांनीं लोकांस वैदिक धर्माचें महत्त्व पटलें व त्याचा जोरानें प्रसार झाला. विष्णु-सहस्रनामावर भाष्य, प्रबोध-सुधाकर, अद्वैतकौस्तुभ, आत्मबोध इत्यादि वेदान्तप्रचुर ग्रंथ लिहून अद्वैत-मताला स्थिरता आणली. गोविंदाष्टक, विष्णुनामाष्टक अंबाष्टक, पांडुरंगा-ष्टक, अच्युताष्टक, कृष्णाष्टक, धन्याष्टक इत्यादि अष्टकें व अनेक स्तोत्रें लिहून ईशस्तवनाकडे लोकांचें चित्त वेधलें.

## अनेक उपासकांचें खंडन

शाक्त—

आचार्यांची स्वारी रामेश्वरांत असतां देवी उपासक शाक्त लोक आचार्यांना वंदन करून म्हणाले, " जिला आद्यशक्ति असें म्हणतात; जी सत्त्व, रज, तम या त्रिगुणांहून अलिप्त आहे व जिच्यापासून मायेच्या साह्यानें महदहंकारपूर्वक संपूर्ण जगत् उत्पन्न झालें; भवानी आदीकरून देवता जिच्या शक्तीपासून उत्पन्न झाल्या तिची सेवा करणें योग्य. तिच्या सुवर्णाच्या पादुका करून त्या बाहूंच्या ठिकाणीं धारण केल्यानें आम्हीं जीवन्मुक्त झालों. देवीच्या उपासनेंतच मुक्ति आहे. "

आचार्य म्हणाले, ' श्रेष्ठ जो पुरुष त्याच्या ज्ञानानेंच मुक्ति मिळते. आत्म्यानें आत्म्याचें ध्यान करूनच प्राणी मुक्त होतो; अन्यथा होत नाहीं. सांख्यांनींहि ईश्वराच्या ज्ञानानें मुक्ति सांगितली आहे. ज्ञानावांचून मुक्ति नाहीं. ज्ञानाचें व ब्रह्माचें ऐक्य आहे. याकरितां ज्ञान साधण्यासाठीं खटपट करा. म्हणजे तीच विद्या अद्वैताचा बोध करणारी होय. तिच्याच सेवनानें मनाची शुद्धि होईल. "

हें तत्त्व पटून अनेक शाक्तपंथी लोक वैदिक धर्माकडे वळले.

लक्ष्मीभक्त—

' सर्व फळ देण्याविषयीं लक्ष्मीच समर्थ आहे. तिलाच परमपुरुषाची प्रकृति असें वेदांनीं म्हटलें आहे. ब्रह्मादिदेव तिच्यापासूनच उत्पन्न झाले. बाहूवर कमल व कपाळावर कुंकुम धारण करून तिची आराधना जे करतात त्यांच्याच हातांत मोक्ष आहे, ' असें लक्ष्मी-भक्तांचें म्हणणें होतें. त्यांचें खंडन करून त्यांना वैदिक धर्माकडे वळविलें– या मताच्या खंडनार्थ आचार्यांचें म्हणणें असें कीं, " परमात्म्यावांचून दुसरा कोणी श्रेष्ठ नाहीं. तोच ब्रह्मस्वरूपी, अद्वितीय, आनंदरूपी असा आहे. त्याच्या

आधीन ही प्रकृति आहे. प्रकृतीला मुक्त करण्याचें सामर्थ्य नाहीं. ब्रह्म तें मीच आहें असें जो ध्यान करतो तोंच ब्रह्मस्वरूप होतो आणि त्यालाच मुक्ति मिळते. लक्ष्मी-उपासकांना अनित्य लोकच प्राप्त होणार. ”

**बौद्धमत—**

इ. स. पूर्वी ६५० पासून बौद्ध धर्माचा उदय झाला. सिद्धार्थ गौतम हा या मताचा पुरस्कर्ता होय. इ. स. पूर्वी ५४३ पर्यंत या धर्माचा एकसारखा प्रसार होत होता. अशोक सम्राटाच्या कारकीर्दींत या धर्मानें उच्चांक गांठला. अशोक इ. स. पूर्वी २३७ मध्यें मरण पावला. यानंतर अनेक राजांनीं वैदिक धर्माचा स्वीकार केल्यानें व बुद्धभिक्षु व भिक्षुणी यांच्यामधील गोंधळानें या धर्मास किंचित् उतरती कळा लागली. सम्राट हर्षाच्या कारकीर्दींत पुनः बौद्ध धर्माची प्रगति झाली. आठव्या शतकांत राजपुतांचा उदय झाला. याच सुमारास हिंदुस्थानच्या धार्मिक स्थितींत मोठी क्रांति घडवून आणणारे थोर पुरुष जन्मले. ते म्हणजे कुमारीलभट्ट व श्रीमज्जगद्‌गुरु आद्य शंकराचार्य होत.

बौद्ध मताचा प्रसार झाल्यापासून लोकांत वेदांविषयीं अनादर पसरलेला होता. त्याचें निराकरण यांनीं केलें. त्यामुळें वेदांस पूर्वीचें वंदनीय स्थान प्राप्त झालें. कुमारीलभट्ट हे कर्मयोगी असून त्यांनीं अग्निहोत्र व हिंसायुक्त यज्ञादि कर्मे यांचा पुरस्कार केला. संन्यासमार्ग तर त्यांना अगदींच पसंत नव्हता. बौद्ध धर्माच्या प्रसारामुळें लोकांत अहिंसा व संन्यास या गोष्टी लोकप्रिय झाल्या. पण कुमारीलभट्टानंतर वेदांच्या आधारानेंच व वेदसूत्रांच्या पायावर आपलें नवीन तत्त्वज्ञान प्रतिपादणारे, संन्यासाचा पुरस्कार करणारे, श्रीशंकराचार्य अवतरले. वेदांविषयीं अपूज्यता व वर्णधर्माविषयीं अनादर हीं जीं दोन प्रमुख बुद्धमतें तीं आचार्यांनीं खोडून काढलीं. बौद्ध धर्मातील अहिंसा मतास मान दिला. पुढें पुढें बौद्ध धर्म केवळ संन्यासी, मुनी वगैरे विरक्तांना रुचूं लागला. बहुजनसमाज वैदिक

धर्माकडे वळला. कुमारीलभट्टानें स्थापिलेल्या वेद प्रामाण्याच्याच पायावर शंकराचार्यांनीं हल्लींची वैदिक धर्माची विस्तृत, मनोहर व भक्कम इमारत उभारली यांत शंका नाहीं.

याचप्रमाणें शारदोपासक, शैव, विद्योपासक, जंगम, वैष्णव इत्यादिकांचें खंडन करून अद्वैत ज्ञानाची महती सर्वांना पटवून त्यांना आपल्या मताकडे वळविलें, व त्यांना आपले शिष्य बनविलें.

## धर्मप्रसार व मठांची स्थापना

बालपणीं गुरुगृहीं केलेला वेदान्ताचा सखोल अभ्यास, मित्र शिष्यांना पाठ देत असतांना अध्यापनाचा अनुभव, गुरु गोविंदनाथांकडून मिळविलेला अनुभव व त्यांचा पूर्ण आशीर्वाद यांनीं युक्त होऊन श्री काशी क्षेत्रांत आल्याबरोबर धर्मप्रसाराचें कार्य आचार्यांनीं सुरू केलें. आपल्या संन्यासी वृत्तीनें, गोड स्वभावानें व अगाध बुद्धिमत्तेच्या बलानें ज़ेथें जेथें ते जातील तेथें तेथें वैदिक धर्माची महती त्यांनीं लोकांना पटविली. अनेक मतानुयायांचें खंडन करून अद्वैत मताची स्थापना केली. मंडनपंडिताला वादांत जिंकून कर्मकांडाचा पराभव करून ज्ञानकांडाच्या श्रेष्ठत्वाचा प्रसार केला. प्रत्येक क्षेत्रास पायीं जाऊन, तेथें दीर्घकाळ राहून, तेथील परिस्थितीचें अवलोन करून आपल्या अमृतमय वाणीनें आसेतुहिमाचल वैदिक धर्माची स्थापना केली. आपण केलेलें कार्य स्थिर राहावें या उद्देशानें मुख्यतः त्यांनीं चार दिशेस चार मठ स्थापिले.

पहिला मठ दक्षिणेस तुंगभद्रेच्या तीरावर शृंगेरीस स्थापून त्यावर सुरेश्वराचार्यांची नेमणूक केली. दुसरा पूर्वेस जगन्नाथ,—त्यावर पद्मपादास नेमलें. तिसरा मठ पश्चिमेस द्वारकेंत स्थापिला. त्यावर हस्तामलकाची नेमणूक केली. चवथा उत्तरेस हिमालयांतील बदरिकाश्रमास स्थापिला. त्यावर तोटकाचार्यांची योजना केली.

# शारदापीठावर आरोहण

आचार्य काशीक्षेत्रांत असतां स्नानसंध्यादि प्रातःकालीन सर्व आन्हिकें संपवून शिष्यांना पाठ देत बसले असतां त्यांनीं असें ऐकलें कीं काश्मीर देशामध्यें एक शारदेचें स्थान आहे. त्याला सर्वज्ञपीठ असें म्हणतात. जो सर्वज्ञ असेल तोच त्यावर चढण्यास योग्य होतो. शारदेच्या देवालयास मोठा सभामंडप असून त्याला चार दरवाजे आहेत. त्यांतील दक्षिण दरवाजा बंद आहे. प्रत्येक दिशेंतून एक एक विद्वान् येऊन त्यानें तेथें परीक्षा देऊन तीन दिशांचे तीन दरवाजे खुले केले आहेत. दक्षिण दरवाजा उघडण्यास अद्याप कोणी समर्थ व विद्वान् पुरुष आला नाहीं. आचार्यांच्या मनांत कल्पना आली कीं आपण जाऊन तें दार उघडावें व त्या सर्वज्ञपीठावर आरोहण करावें. ही कल्पना मनांत येतांच सर्व शिष्यांसह आचार्य निघाले व काश्मिरांतील शारदापीठाच्या द्वारापाशीं आले. द्वारपालानें आचार्यांना अडवून म्हटलें, "आपण विविध शास्त्रांत पारंगत; विद्वानांच्या समोर सर्व शास्त्रांची परीक्षा द्यावी. त्यांत उत्तीर्ण झाल्यास आपणांस आंत जाण्यास परवानगी मिळेल." आचार्य परीक्षकांची वाट पाहात तेथेंच थांबले. द्वारपालानें गांवांत तशी दौंडी पिटविली. सर्व शास्त्रांत प्रवीण लोक तेथें जमले. आचार्यांना पाहण्यासाठीं त्या गांवांतील सर्व लोक तेथें आले. परीक्षेसाठीं विद्वानांची मोठी सभा भरली. शास्त्रज्ञांनीं आचार्यांना अनेक विषयांवर विविध प्रश्न विचारले. प्रत्येक मतांत त्यांची परीक्षा झाली. सर्व प्रश्नांना आचार्यांनीं योग्य उत्तरें दिल्यानें व सर्व मतांचें मर्म बरोबर सांगितल्यानें सभेंतील सर्व विद्वान् संतुष्ट झाले. त्यांनीं आचार्यांची पूजा केली व दक्षिण दरवाजा आचार्यांना मोकळा करून दिला. आचार्यांनीं सभामंडपांत प्रवेश केला. तेथील तें भव्य सर्वज्ञसिंहासन पाहिलें. पद्मपाद शिष्याचा हात धरून ते त्या पीठावर चढणार तोंच आकाशवाणी झाली. "तूं सर्वज्ञ आहेस यांत शंका नाहीं. तूं यतिधर्मांत असतांना परकाया प्रवेश करून अनेक स्त्रियांचा उपभोग घेतला आहेस. तेव्हां तूं

शुद्ध नाहींस. या सिंहासनावर आरोहण करण्यास जशी सर्वज्ञता लागते तशीच शुद्धताहि लागते. ”

आचार्यांनीं या वाणीस उत्तर दिलें, “ देहान्तरानें जें कांहीं केलें असेल, त्या कर्मापासून ह्या देह लिप्त होत नाहीं. आपली शंका बरोबर नाहीं. एका देहानें केलेलें कर्म दुसऱ्या देहास लागूं नाहीं. ”

आकाशवाणींतील सर्व शंकांचें निरसन करून त्या पुराणप्रसिद्ध सर्वज्ञपीठावर आचार्यांनीं निर्भयपणें आरोहण केलें. आनंदाच्या जयघोषानें सारी सभा दणाणून गेली. आचार्य त्या पीठावर बृहस्पतीप्रमाणें शोभूं लागले.

## आचार्यांचें कैलास-गमन (इ. स. ८२०)

सर्वज्ञ-पीठावर आरोहण करून आचार्य कृतकृत्य झाले. चारहि दिशांस चार मठांवर आपल्या विश्वासुक शिष्यांची स्थापना केली. त्यांना पुढील मार्ग सांगितला. आचार्यांना शांत स्थानाची जरुरी भासूं लागली. इतर शिष्यांसह आचार्य हिमालयावरील बदरिकाश्रमीं गेले. तेथें पातंजल मताच्या लोकांना आपलें भाष्य पढवून त्यांना अद्वैतमार्गी केलें. इतक्यांत आचार्यांची आयुर्मर्यादा संपण्याची वेळ आली. आचार्य हिमालयांतील केदारस्थानीं गेले. तेथील थंडीचा शिष्यांना फारच त्रास होऊं लागला. आचार्यांनीं शंकराची प्रार्थना केली. उष्णोदकाचा झरा उत्पन्न झाला. तेथेंच आचार्य कांहीं दिवस राहिले.

आचार्यांना बत्तीस वर्षें पूर्ण झालीं. वैदिक धर्माच्या उद्धाराचें कार्य झालें. सर्व देव तेथें जमले. सर्वांनीं आचार्यांची पूजा केली. सर्व देव म्हणाले, “ हे भगवन्! आपण ज्या कार्यासाठीं भूमीवर अवतार धारण केलांत तें कार्य तर झालें. तेव्हां आपण आतां कैलासास येऊन आम्हांला सनाथ करावें. ” आचार्यांनीं तें मान्य केलें. सर्व शिवगणांसह नंदी तेथें आला. ब्रह्मदेवानें आचार्यास नंदीवर चढण्यास हात दिला. नंदीवर बसून आचार्य कैलासास गेले व शिवरूपांत लीन झाले.

# आचार्यांची काव्यशैली

## षट्पदी

अविनयमपनय विष्णो दमय मनः शमय विषयमृगतृष्णाम् ॥
भूतदयां विस्तारय तारय संसारसागरतः ॥ १ ॥
दिव्यधुनीमकरंदे परिमलपरिभोगसच्चिदानन्दे ।
श्रीपतिपदारविंदे भवभयखेदच्छिदे वंदे ॥ २ ॥
सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम् ।
सामुद्रो हि तरङ्गः क्वचन समुद्रो न तारंगः ॥ ३ ॥
उद्धृतनग नगभिदनुज दनुजकुलामित्र मित्रशशिदृष्टे ।
दृष्टे भवति प्रभवति न भवति किं भवतिरस्कारः ॥ ४ ॥
मत्स्यादिभिरवतारैरवतारवताऽवता सदा वसुधाम् ।
परमेश्वर परिपाल्यो भवता भवतापभीतोऽहम् ॥ ५ ॥
दामोदर गुणमन्दिर सुंदरवदनारविन्द गोविन्द ।
भवजलधिमथनमंदर परमं दरमपनय त्वं मे ॥ ६ ॥
नारायण करुणामय शरणं करवाणि तावकौ चरणौ ।
इति षट्पदी मदीये वदनसरोजे सदा वसतु ॥ ७ ॥

# शिवमानसपूजा

रत्नैः कल्पितमासनं हिमजलैः स्नानं च दिव्यांबरम्
नानारत्नविभूषितं मृगमदामोदांकितं चंदनम् ।
जातीचम्पकबिल्वपत्ररचितं पुष्पं च धूपं तथा
दीपं देव दयानिधे पशुपते हृत्कल्पितं गृह्यताम् ॥ १ ॥

सौवर्णे नवरत्नखंडरचिते पात्रे घृतं पायसं
भक्ष्यं पंचविधं पयोदधियुतं रंभाफलं पानकम् ।
शाकानामयुतं जलं रुचिकरं कर्पूरखंडोज्ज्वलं
तांबूलं मनसा मया विरचितं भक्त्या प्रभो स्वीकुरु ॥ २ ॥

छत्रं चामरयोर्युगं व्यजनकं चादर्शकं निर्मलं
वीणाभेरिमृदंगकाहलकलागीतं च नृत्यं तथा ।
साष्टांगं प्रणतिः स्तुतिर्बहुविधा ह्येतत्समस्तं मया
संकल्पेन समर्पितं तव विभो पूजां गृहाण प्रभो ॥ ३ ॥

आत्मा त्वं गिरिजा मतिः सहचराः प्राणाः शरीरं गृहं
पूजा ते विषयोपभोगरचना निद्रा समाधिस्थितिः ।
संचारः पदयोः प्रदक्षिणविधिः स्तोत्राणि सर्वा गिरो
यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम् ॥ ४ ॥

करचरणकृतं वाक्कायजं कर्मजं वा
श्रवणनयनजं वा मानसं वाऽपराधम् ।
विहितमविहितं वा सर्वमेतत्क्षमस्व
जय जय करुणाब्धे श्रीमहादेव शंभो ॥ ५ ॥

४३३४

# पांडुरंगाष्टकम् ।

महायोगपीठे तटे भीमरथ्यां वरं पुण्डरीकाय दातुं मुनींद्रैः ।
समागत्य तिष्ठंतमानन्दकन्दं परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ १ ॥
तडिद्वाससं नीलमेघावभासं रमामंदिरं सुन्दरं चित्प्रकाशम् ।
वरं त्विष्टिकायां समन्यस्तपादं परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥२॥
प्रमाणं भवाब्धेरिदं मामकानां नितंबः कराभ्यां धृतो येन तस्मात् ।
विधातुर्वसत्यै धृतो नाभिकोशः परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ ३ ॥
स्फुरत्कौस्तुभालंकृतं कंठदेशे श्रिया जुष्टकेयूरकं श्रीनिवासम् ।
शिवं शान्तमीड्यं वरं लोकपालं परब्रह्मरूपं भजे पांडुरंगम् ॥ ४ ॥
शरच्चंद्रबिंबाननं चारुहासं लसत् कुंडलाक्रान्तगंडस्थलांगम् ।
जपारागबिंबाधरं कंजनेत्रं परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ ५ ॥
किरीटोज्ज्वलत्सर्वदिक्प्रांतभागं सुरैरर्चितं दिव्यरत्नैरनर्घ्यैः ।
त्रिभंगाकृतिं बर्हमाल्यावतंसं परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ ६ ॥
विभुं वेणुनादं चरंतं दुरंतं स्वयं लीलया गोपवेषं दधानम् ।
गवां वृंदकानंदनं चारुहासं परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ ७ ॥
अजं रुक्मिणीप्राणसंजीवनं तं परं धाम कैवल्यमेकं तुरीयम् ।
प्रसन्नं प्रपन्नार्तिहं देवदेवं परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ ८ ॥
स्तवं पाण्डुरंगस्य वै पुण्यदं ये पठंत्येकचित्तेन भक्त्या च नित्यम् ।
भवांभोनिधिं तेऽपि तीर्त्वाऽन्तकाले हरेरालयं शाश्वतं प्राप्नुवन्ति ॥९॥

25502
वा.वा
2062
नों. दि 3-7-6

# लक्ष्मीनृसिंहस्तोत्रम् ।

श्रीमत्पयोनिधिनिकेतनचक्रपाणे भोगींद्रभोगमणिरंजितपुण्यमूर्ते ।
योगीश शाश्वत शरण्य भवाब्धिपोत लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलंबम् ॥
ब्रह्मेंद्ररुद्रमरुदर्ककिरीटकोटि संघट्टिताङ्घ्रिकमलामलकांतिकांत ।
लक्ष्मीलसत्कुचसरोरुहराजहंस लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलंबम् ॥
संसारघोरगहने चरतो मुरारे मारोग्रभीकरमृगप्रवरार्दितस्य ।
आर्तस्य मत्सरनिदाघनिपीडितस्य लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलंबम् ।
संसारकूपमतिघोरमगाधमूलं संप्राप्य दुःखशतसर्पसमाकुलस्य ।
दीनस्य देव कृपणापदमागतस्य लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलंबम् ॥
संसारसागरविशालकरालकालनक्रग्रहग्रसनानिग्रहविग्रहस्य ।
व्यग्रस्य रागरसनोर्मिनिपीडितस्य लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलंबम् ॥
संसारवृक्षमघबीजमनंतकर्मशाखाशतं करणपत्रमनंगपुष्पम् ।
आरुह्य दुःखफलितं पततो दयालो लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलंबम् ॥
संसारसर्पघनवक्त्रभयोग्रतीव्रदंष्ट्राकरालविषदग्धविनष्टमूर्तेः ।
नागारिवाहन सुधाब्धिनिवास शौरे लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलंबम् ॥
संसारदावदहनातुरभीकरोरुज्वालावलीभिरतिदग्धतनूरुहस्य ।
त्वत्पादपद्मसरसीशरणागतस्य लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलंबम् ॥
संसारजालपतितस्य जगन्निवास सर्वेन्द्रियार्थबडिशार्थझषोपमस्य ।
प्रोत्खंडितप्रचुरतालुकमस्तकस्य लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलंबम् ॥
संसारभीकरकरींद्रकलाभिघातनिष्पिष्टमर्मवपुषः सकलार्तिनाश ।
प्राणप्रयाणभवभीतिसमाकुलस्य लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलंबम् ॥
अंधस्य मे हृतविवेकमहाधनस्य चोरैः प्रभो बलिभिरिंद्रियनामधेयैः ।
मोहान्धकूपकुहरे विनिपातितस्य लक्ष्मीनृसिंह मम देहि करावलंबम् ॥
लक्ष्मीपते कमलनाभ सुरेश विष्णो वैकुंठ कृष्ण मधुसूदन पुष्कराक्ष ।
ब्रह्मण्य केशव जनार्दन वासुदेव देवेश देहि कृपणस्य करावलंबम् ॥
यन्माययोर्जितवपुः प्रचुरप्रवाहमग्नार्थमंत्रनिवहोरुकरावलंबम् ।
लक्ष्मीनृसिंह चरणाब्जमधुव्रतेन स्तोत्रं कृतं सुखकरं भुवि शंकरेण ॥

२९९०२

RRMRBK-0204334